
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २८७
www.ramprahar.com
रविवार, ५ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राहुल गांधी यांच्या सभेत संजोग वाघेरेंना नो एण्ट्री!



**पुणे :** महाविकास आघाडीतील ठाकरे गटाचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांची त्यांच्याच मित्रपक्षाचे नेते दखल घेत नसून मतदार तरी त्यांना कशी साथ देणार, असा सवाल पुण्यात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या झालेल्या सभेनंतर व्यक्त होत आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाविकास आघाडीचे पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि.३) सभा घेतली. या सभेदरम्यान ठाकरे गटाचे मावळ मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे यांना स्टेजवर जाऊ दिले नाही. या वेळी ठाकरे गट आणि पोलिसांमध्ये बाचाबाचीही झाली. सभा संपेपर्यंत वाघेरे बाहेरच होते. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, या सर्व प्रकारामुळे मविआतील घटकपक्ष ठाकरे गटाला महत्त्व देत नसून मावळचे मतदार तरी कसे देणार, अशी चर्चा रंगली आहे.

### अंतरंग
माळशेज घाटामध्ये भीषण अपघात; तीन जणांचा मृत्यू/२
पेण तालुक्यात गावठी हातभट्ट्या उद्ध्वस्त/५
अमेरिकेच्या वर्ल्डकप संघात निम्मे खेळाडू भारतीय/८

# सत्तेत असताना का नाही बोलले?

## प्रकल्पांच्या विरोधावरून राज ठाकरेंचा उद्धव ठाकरेंना सवाल

**कणकवली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने तुमची अडीच वर्षे मान्य केली असती, तर तुम्ही आज बोलला नसतात, कारण ती गोष्ट हिरावून घेतली म्हणून आग लागली. त्या वेळी सत्तेचा बोळा कोंबला असता, अशी टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी (दि.४) माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर केली. कोकणातील उद्योगधंदे गुजरातला चालले याबद्दल तुम्ही बोलला. राज्यातील साडेसात वर्षे उद्धव ठाकरे सत्तेत होते. तेव्हा का बोलला नाहीत? असा प्रश्नही राज यांनी विचारला आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या प्रचारार्थ कणकवली येथे सभा घेतली. या वेळी त्यांनी विरोधकांवर टीका केली आणि प्रामुख्याने उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.



सध्या अनेक अणुऊर्जा प्रकल्प भारतात आहेत, पण स्फोट झाला तर काय होईल याची भीती कोकणाला दाखवली जाते. कोकणात प्रकल्प येऊ द्यायचा नाही. यांचा खासदार नाणारला विरोध करणार आणि लोकांना भडकवणार, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला. नाणारमध्ये जमीन घेतल्या आहेत त्या कोणी घेतल्या? यांनी नाणारला विरोध केला. मुख्यमंत्री झाल्यावर बारसूत प्रकल्प हलवायचे म्हटले. तेथे पाच हजार एकर जमीन सापडली म्हणाले. म्हणजे कोणीतरी घेऊन ठेवली होती. यांच्याच लोकांनी जमिनी घेऊन ठेवल्या, असा आरोप राज यांनी केला.

पहिल्यांदा प्रकल्प थांबवायचा आणि जमिनीच्या किंमती वाढवायच्या हे इथल्या खासदाराचे धंदे असल्याचे राज ठाकरे म्हणाले. उद्योगधंदा आला की यांचा खासदार विरोध करणार आणि आमदार सहकार्य करणार अशी यांची दुटप्पी भूमिका आहे. कोकणात चांगले प्रकल्प यावेत ही प्रत्येकाची इच्छा आहे. अख्खे जग गोव्यात जाते, याकडे राज ठाकरेंनी लक्ष वेधले.

नारायण राणे मुख्यमंत्री झाले तेव्हा मला प्रश्न पडला होता, पण त्यांनी ज्या पद्धतीने मुख्यमंत्री पद हाकले ते भल्याभल्यांना जमले नाही. कोकणासाठी जे काही तुम्हाला वाटते ते करु शकणारा माणूस फक्त नारायण राणे आहे, असे राज ठाकरे म्हणाले.

### उद्धव ठाकरे विकृत माणूस -ना. राणे

या वेळी केंद्रीय मंत्री व महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंचा उल्लेख विकृती असलेला माणूस असा केला. तुम्हाला ४० आमदार सांभाळता आले नाहीत. ४० आमदार डोळ्यासंमोरून चालत गेले, तुम्ही काही अडवू शकला नाहीत. दम वगैरे देण्याचे काम तुमचे नाही. म्हणे आडवे आलात तर गाडून पुढे जाईन, पण गाडायला ताकद लागते, वाकावे लागते. ते तुम्हाला जमत नाही. २० पावले तुम्ही चालू शकत नाही, अशी टीकाही त्यांनी केली.



## महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचा प्रचार दौरा

### मतदारांशी साधला संवाद

**चौक : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी शनिवारी (दि. ४) उरण विधानसभा मतदासंघातील खालापूर आणि पनवेल तालुक्यात झंझावाती प्रचार दौरा केला. प्रचार दौऱ्यादरम्यान त्यांनी मतदारांशी संवाद साधत विजयाचे आवाहन केले.



या प्रचार दौऱ्यात खासदार बारणे यांच्यासह उरणचे आमदार महेश बालदी, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे व महायुतीचे प्रमुख पदाधिकारी रथामध्ये सहभागी झाले होते. त्यांचे ठिकठिकाणी पुष्पगुच्छ देऊन आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले.

प्रचारदौरा खालापूरच्या वावर्ले येथील मंदिरातून सुरू झाला. पुढे विभाग, गावे करीत चौकफाटा, चौक शहर, तुपगाव, लोहोप, माजगाव, वानिवली, तळवली, मोहोपाडा, आळी आंबिवली, पानशिल, तळेगाव, वासांबे विभाग तसेच पनवेल तालुक्यात रथ तसेच बाईक रॅली फिरविण्यात आली.

या वेळी भाजपचे खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, आरपीआयचे नेते महेंद्र धनगावकर, उपाध्यक्ष सागर ओसवाल, चौकच्या सरपंच रितू ठोंबरे, तुपगावचे सरपंच रवींद्र कुंभार, प्रदीप गोंधळी, मनसेचे आशिष चौधरी, वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप मुंढे, राष्ट्रवादीच्या नेत्या उमाताई मुंडे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश कांबळे, आरपीआयचे पंकज सोनावळे, माजी सरपंच सचिन तांडेल, अमित शहा, प्रवीण जांभळे, भाजपचे नेते प्रवीण खंडागळे, प्रमोद जांभळे, स्वप्नील राऊत, शिवसेनेच्या वैजयंती ठाकूर, मनसेचे तालुका अध्यक्ष आशिष चौधरी, प्रशांत नेमाने, मोहन मुकादम, विजय ठोसर यांच्यासह शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, रासप, आरपीआय, मनसे, पीआरपी मित्रपक्ष महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी उठवली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर घालण्यात आलेली बंदी मागे घेतली आहे. काही दिवसांपूर्वीच याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. याबाबतची अधिसूचना सरकारकडून जारी करण्यात आली आहे.

कांदा निर्यातीवर आता ४० टक्के शुल्क लावून निर्यातीला परवानगी देण्यात आली आहे तसेच ३१ मार्च २०२५पर्यंत देशी चण्याच्या आयातीवरील शुल्कात सूट दिली आहे. निर्यातबंदी हटवल्याने महाराष्ट्रातील कांद्याची सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या



लासलगाव बाजार समितीत चांगले परिणाम दिसू लागले आहेत. कांद्याच्या भावात वाढ झाली आहे. बाजारभावात वाढ झाल्याने कांदा उत्पादकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

केंद्र सरकारच्या निर्णयाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले. एक्सवर प्रतिक्रिया देताना ते म्हटले, कांदा निर्यात बंदी संपूर्णतः मागे घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अनेकानेक आभार. केंद्र सरकारने याबाबतची अधिसूचना जारी केली. महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे. सरसकट निर्यातीला परवानगी देतानाच कांदा उत्पादकांना चांगला भाव मिळावा याचीही काळजी घेण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री व दिंडोरीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनीही कांदा निर्यात खुली झाली आहे, त्याचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## नंदेश उमप बसपकडून लढणार

**मुंबई :** सध्या सगळीकडे लोकसभा निवडणुकीचे वारे वाहतेय. निवडणुकीच्या प्रचारासाठी अनेक कलाकार पुढे येताना दिसत आहेत, तर काही कलाकार थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. कंगना रणौत, हेमा मालिनी आदी कलाकार निवडणूक लढवताना दिसत आहेत. अशातच मराठमोळे गायक नंदेश उमप हेही आता राजकारणात उतरले असून निवडणूक लढवणार आहेत. मायावती यांच्या बहुजन समाजवादी पक्षाकडून ते लोकसभेची निवडणूक लढवणार आहेत. त्यांनी निवडणूक अर्ज दाखल केला.

नंदेश उमप यांना मुंबई उत्तर पूर्व मतदारसंघातून बसपकडून तिकीट देण्यात आले आहे. याच मतदारसंघातून महायुतीकडून भाजपचे मिहीर कोटेचा आणि महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे उमेदवार संजय दिना पाटील रिंगणात आहेत.

### निवडक

#### गोल्डी ब्रार जिवंत; हत्येचा दावा खोटा

**कॅलिफोर्निया :** सिद्धू मुसेवाला हत्येचा मास्टरमाईंड इंडो-कॅनडियन गँगस्टर गोल्डी ब्रार जिवंत असल्याचे अमेरिकन पोलिसांनी सांगितले आहे. गोल्डी ब्रारच्या हत्येच्या बातम्या खोट्या आहेत. गोळीबारात मृत्यू झालेल्या ३७ वर्षीय व्यक्तीची ओळख पटली असून त्याचे नाव झेवियर ग्लॅडनी असे असल्याचे अमेरिकन पोलिसी अधिकारी टोनी बोटी यांनी म्हटल्याचे वृत्त आहे.

#### अरविंद केजरीवाल यांना जामिनाची आशा

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्याचा विचार केला जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. त्यामुळे दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे सर्वे सर्वा केजरीवाल यांच्यासाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे. मद्य धोरण घोटाळाप्रकरणी ईडीने अटक केल्याने ते सध्या तिहार तुरुंगात अटकेत आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर मंगळवारी (७ मे) सुनावणी होणार आहे. त्या वेळी काय होणार याकडे लक्ष लागले आहे.

## रायगड लोकसभेच्या सहाही विधानसभा मतदारसंघात तटकरेंना आघाडी मिळणार

### आमदार प्रवीण दरेकर यांचा विश्वास

**महाड : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक ही देशाचे भवितव्य ठरविणारी निवडणूक आहे. त्यामुळे देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांचे घड्याळ हे चिन्ह घराघरापर्यंत पोहचवा आणि मतदारांना मोदीजींनी केलेल्या कामांची व योजनांची माहिती देऊन मतदानासाठी प्रेरित करा, असे आवाहन भाजपचे विधान परिषदेतील गटनेते तथा रायगड लोकसभा निरीक्षक आमदार प्रवीण दरेकर यांनी येथे केले.

रायगड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि.३) सायंकाळी नातेखिंड येथे भाजपाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी आमदार दरेकर बोलत होते. महाड विधानसभा मतदारसंघातून या निवडणुकीत भाजप



४० हजार मतांचा टप्पा गाठणार तसेच रायगड लोकसभेच्या सहाही विधानसभा मतदारसंघात तटकरेंना आघाडी मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या मेळाव्यास अमरावतीचे आमदार आणि भाजपचे महाड विधानसभा मतदारसंघ निरीक्षक प्रताप अडसड, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील उपस्थित होते. या वेळी ख्रिस्ती समुदायाचे नेतृत्व सॅम्युएल नावकर, करंजखोलचे मयुर महाडिक, उबाठा गटाचे कोंझरचे माजी सरपंच निलेश देवगिरकर यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

आमदार प्रताप अडसड यांनी महाडमधील चित्र समाधानकारक व पक्षाच्या भविष्याचा दृष्टीने उज्ज्वल असल्याची भावना व्यक्त केली.

बाळासाहेब पाटील म्हणाले की, दुसऱ्या देशांमध्येदेखील आदरयुक्त दरारा निर्माण करणारा पंतप्रधान यापूर्वी झाला नाही. प्रत्येक भारतीयाचे स्वप्न मोदीजींनी पूर्ण केले आहे.

या मेळाव्यास भाजप जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, ज्येष्ठ कार्यकर्ते शेखर ताडफळे, नाना महाले, मनोज भागवत, संदीप ठोंबरे, डॉ. अजय जोगळेकर, सुधीर महाडिक, मनोज भागवत, महेश शिंदे, मंजुषा जोशी, अश्विनी कद्रू आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दहावी, बारावीचा निकाल यंदा लवकर लागणार

**पुणे : प्रतिनिधी**


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल गेल्या वर्षीपेक्षा लवकर जाहीर केला जाणार आहे. त्याबाबतचे संकेत राज्य मंडळाने दिले आहेत.

राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा १ ते २६ मार्चदरम्यान घेण्यात आली. दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख विद्यार्थ्यांनी, तर बारावीच्या परीक्षेसाठी १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

गेल्या काही दिवसांपासून दहावी-बारावीच्या परीक्षांच्या निकालाची चर्चा सुरू झाली आहे. त्यातून समाजमाध्यमांमध्ये निकालाच्या तारखा फिरत असल्याने संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे निकाल २० मेनंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्य मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा निकाल कधी जाहीर केला जाणार याबाबत उत्सुकता आहे.

गेल्या वर्षी राज्य मंडळाने बारावीच्या परीक्षेचा निकाल २५ मे रोजी, तर दहावीच्या परीक्षेचा निकाल २ जून रोजी जाहीर केला होता, मात्र यंदा गेल्या वर्षीपेक्षाही लवकर निकाल जाहीर करण्याची तयारी असल्याची माहिती राज्य मंडळाकडून देण्यात आली. त्यामुळे दहावी आणि बारावीची परीक्षा दिलेले विद्यार्थी, त्यांच्या पालकांना पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक ती तयारी करण्यास वेळ मिळणार आहे.

### राज्य मंडळाकडून संकेत



**राज्य मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. बारावीचा निकाल मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल मे अखेरीस जाहीर करण्याचे नियोजन आहे. यंदा निकाल गेल्या वर्षीपेक्षा लवकर जाहीर करण्याचा प्रयत्न आहे.**
**-शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य मंडळ**

## मतदानासाठी ओळखीचे १२ पुरावे ठरणार ग्राह्य

### हक्क बजावून लोकशाहीच्या महाउत्सवात सहभागी होण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मतदान करण्यासाठी निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ पुरावे ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

रायगड जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत ७ मे रोजी रायगड आणि १३ मे रोजी मावळ या दोन मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जावळे यांनी म्हटले आहे की, ज्यांच्याकडे छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र आहे असे मतदार ते मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी सादर करतील. छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत अशा मतदारांची



ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर पुराव्यांमध्ये पारपत्र (पासपोर्ट), वाहनचालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरीत आरोग्य विमा स्मार्ट कार्ड यांचा समावेश आहे. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण करण्यात येत आहे. मतदारांनी मतदार माहिती चिठ्ठी व ओळखीचा पुरावा सोबत ठेवून मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आहे.

### मतदान केंद्राविषयी जाणून घ्या...

मावळ लोकसभा मतदारसंघांतर्गत पिंपरी, चिंचवड, मावळ, कर्जत, पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो, तर रायगड लोकसभा मतदारसंघांतर्गत पेण, अलिबाग, महाड, श्रीवर्धन गुहागर व दापोलीचा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. लोकसभा मतदारसंघ क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता नागरिकांनी मतदानापूर्वी आपल्या मतदान केंद्राची माहिती घ्यावी. जिल्हा प्रशासनाने मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे या दृष्टीने मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी मतदार सहाय्यता केंद्र स्थापित केले आहेत. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा ॲपद्वारेही ही माहिती मिळू शकेल तसेच मतदारांना वितरीत करण्यात येणाऱ्या मतदार माहिती चिठ्ठीद्वारेदेखील कुठे मतदान करावयाचे आहे ते कळू शकेल, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी म्हटले आहे.

## उमेदवारी अर्ज बाद होऊनही शांतिगिरी महाराज रिंगणात

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक मतदारसंघातील उमेदवारांच्या अर्ज छाननीत शांतिगिरी महाराज यांचा अर्ज बाद झाला आहे. शिंदे ग्रुप असा उल्लेख करून दाखल केलेला हा अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी शिवसेनेचा एबी फॉर्म सोबत नसल्याने बाद केला. असे असले



तरी त्यांचा दुसरा अपक्ष म्हणून सादर केलेला अर्ज वैध ठरल्याने ते निवडणूक रिंगणात कायम आहेत.

शांतिगिरी महाराज यांनी आपल्या भक्त आणि अनुयायांसह मिरवणूक काढून शिंदे ग्रुप असे नमूद करीत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या अर्जासोबत पक्षाचा एबी फॉर्म जोडलेला नव्हता. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांना लिखित पत्र देऊन ३ एप्रिलपर्यंत एबी फॉर्म सादर करण्याच्या सूचना केल्या होत्या, मात्र या मुदतीत एबी फॉर्म जोडता न आल्याने शनिवारी (दि. ४) झालेल्या छाननीत त्यांचा अर्ज बाद ठरला, तर अपक्ष उमेदवार म्हणून त्यांचा अर्ज कायम आहे.

# कल्याणमध्ये उद्धव ठाकरेंना पुन्हा धक्का

## उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे, प्रेमा म्हात्रेंचा शिवसेनेत प्रवेश

**ठाणे : प्रतिनिधी**

कल्याण लोकसभा मतदार संघामध्ये निवडणुकीच्या तोंडावर पक्षांतराचे वारे गेल्या काही दिवसांपासून जोरदार वाहू लागले असून उबाठा गटाचे कल्याण ग्रामीणमधील उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे आणि माजी नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ४) शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेशाच्या माध्यमातून शिंदेंनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांना धक्का दिल्याचे चित्र आहे.



शिवसेनेतील बंडानंतर ठाणे जिल्ह्यातील अनेक आमदार, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साथ दिली तर, काही पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहणे पसंत केले, परंतु लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा दिवस जसा जवळ येऊ लागला आहे, तसा उद्धव ठाकरे यांच्या गटातील पदाधिकारी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करताना दिसू लागले आहेत. मुख्यमंत्री पुत्र व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघात अशीच काहीसे चित्र आहे. चार दिवसांपुर्वी डोंबिवलीतील उबाठा गटाचे शहर प्रमुख विवेक खामकर, महिला जिल्हा संघटक कविता गावंड यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदेच्या सेनेत प्रवेश केला. त्यापाठोपाठ आता उबाठा गटाचे कल्याण ग्रामीणमधील उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे आणि माजी नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्यासह केशव पाटील, शाखाप्रमुख परेश पाटील, उमेश सुर्वे, अशोक पाटील, विजय पाटील आणि अन्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाच्या माध्यमातून शिंदेच्या सेनेकडून उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा धक्का देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहचला असून राज्यात तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराचा आज शेवट होत आहे. त्यानंतर, ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यात मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील काही जागांवर मतदान होत आहे. दुसरीकडे महायुती व महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांची यादी जाहीर झाली

### ‘उबाठाकडून भ्रमनिरास’

*उबाठा गटाकडून आपल्याला विश्वासात घेतले गेले नाही, आणि आपला भ्रमनिरास झाला आहे. गेल्या १० वर्षात कल्याण लोकसभेत विकासाची गंगा आली असून आपण आता विकासापासून अलिप्त राहू शकत नाही. शिवसेनेत ४० वर्ष काम करूनही मला मातोश्रीवर कुणी ओळखत नाही. बाळासाहेब हयात होते, तोपर्यंत आमची श्रद्धा होती, पण आता आमची मातोश्री ठाणेच आहे, अशी भावना या वेळी प्रकाश म्हात्रे यांनी व्यक्त केली.*

**या सर्वांना उबाठा गटात मिळालेली वागणूक या सर्वाला कारणीभूत असून दुसरीकडे राज्य सरकार आणि शिवसेना यांचे काम उत्तम सुरू आहे. विकास हाच आमचा अजेंडा आहे. त्यामुळे एका विश्वासाने लोक शिवसेनेत येत आहेत.**

**–एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री

# माळशेज घाटात भीषण अपघात; तीन जणांचा जागीच मृत्यू

**मुरबाड : प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटात भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली. दुधाचा टँकर आणि मालवाहू टँकरमध्ये धडक झाल्याने हा अपघात झाला. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातानंतर वाहतूक सेवा विस्कळीत झाली होती. तसेच रस्त्यावरही बराच वेळ गोंधळ निर्माण झाला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण नगर महामार्गावरील माळशेज घाटातील भोरांडे गावाजवळ हा अपघात झाला. या वेळी आळेफाट्याचे दिशेने कल्याणकडे जाणारा दुधाचा ट्रक आणि माळशेज घाटाकडे जाणारा भाजीपाल्याचा टेम्पो यांची समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की या अपघातात दुधाचा टँकर रोडपासून खाली कोसळला. यात टेम्पोचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

माळेशज घाटात झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये पती–पत्नींचा समावेश आहे, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. अक्षय दिघे आणि त्यांची पत्नी तेजस दिघे अशी या दोन मृतांची नावे आहेत. ते दोघेही पोलीस आहेत.

तर त्यांच्या गाडीचा चालक वामन यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. या अपघातात एक लहान मुलगा जखमी झाला असून त्याला टोकावडे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



# ‘उद्धव ठाकरे हे आधुनिक महाभारतातील दुर्योधन’

**कर्जत : प्रतिनिधी**

कोरोनाच्या संकटकाळात घरातून बाहेर न पडता ’फेसबुक लाईव्ह करण्यातच धन्यता मानणाऱ्यांना कायमचे घरी बसवा. सत्तेसाठी शरद पवार यांच्या मांडीवर जाऊन बसणारे उद्धव ठाकरे हे आधुनिक महाभारतातील दुर्योधनच आहेत. मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांना आमदार सांभाळता आले नाहीत. त्यामुळे त्यांना सहानुभूती दाखविण्याचे काहीही कारण नाही. मनसेचे नगरसेवक फोडणाऱ्या उद्धव ठाकरे यांना त्यांच्या आमदारांनी साथ सोडली तेव्हा वाईट वाटायचे काहीच कारण नाही.



मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना – भाजप – राष्ट्रवादी – मनसे – आरपीआय – रासप– मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता महामेळावा शेळके बंधू साईकृपा सभागृहात आयोजित केला होता. याप्रसंगी मनसेचे नेते अमेय खोपकर, दिलीप बापू धोत्रे, आमदार महेंद्र थोरवे, रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सचिन करणुक, कर्जत तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर, खालापूर तालुकाध्यक्ष विजय सावंत, पनवेल तालुकाध्यक्ष रामदास पाटील, जिल्हा सचिव अक्षय महाले, जे पी पाटील, महिला जिल्हाध्यक्ष सपना राऊत, तालुकाध्यक्ष महेंद्र निगुडकर आदी उपस्थित होते.

संदीप देशपांडे पुढे म्हणाले, ’सत्तेच्या लालसेपोटी पवारांच्या मांडीवर जाऊन बसलेले आधुनिक महाभारतातील ते दुर्योधन आहेत. संजोग वाघेरे हे मूळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. राष्ट्रवादीची पोर सांभाळायला उद्धव ठाकरे यांनी पक्ष काढला आहे का? मशिदींवरील भोंग्यांच्या विरोधात आंदोलन केले म्हणून आमच्यावर खोट्या केसेस टाकल्या, माझ्यावर मारेकरी घातले, तेव्हा कुठे होती लोकशाही? राजकारणी म्हणून उद्धव ठाकरे नीच आहेतच, पण भाऊ म्हणूनदेखील ते नीच आहेत.

# पनवेल रोहिदास वाड्यातील कामांबद्दल नागरिकांकडून परेश ठाकूर यांचे आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रोहिदास वाड्यात पनवेल महापालिकेच्या वतीने रस्त्यांची आणि बंद गटारे खुली करण्याची कामे सुरू आहेत. या कामाचा पाठपुरावा करणारे पनवेल मनपाचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे नागरिकांनी आभार मानले.



रोहिदास वाड्यात पनवेल महापालिकेच्या वतीने रस्त्यांची आणि बंद गटारे खुली करण्याची कामे सुरू असून या कामांची महापालिकेचे वरीष्ठ अभियंता राजेश कर्डीले यांनी गुरुवारी अधिकाऱ्यांसह पाहणी करुन कामांसंदर्भात आवश्यक त्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. रोहीदास वाड्यातील रहिवाश्यांना पाण्याच्या दुर्गंधीचा, उघड्या गटारांचा आणि यामुळे निर्माण होणाऱ्या डासांचा सामना करावा लागत होता. तसेच यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्नदेखील निर्माण झाला होता. या संदर्भात रोहीदास वाड्यातील रहिवाश्यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याशी संपर्क साधून ही समस्या मार्गी लावण्याची मागणी केली होती. त्यानुसार परेश ठाकूर यांनी महापालिकेशी संपर्क साधून हे पाठपुरावा केला होता. त्यानुसार महापालिकेच्या वतीने रस्ता आणि बंद गटारांचे कामे सुरू झाले असून या कामाची वरिष्ठ अभियंता राजेश कर्डीले यांनी कामाची पहाणी करून काम चांगल्या दर्जाचे करण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान, रोहिदास वाड्यातील नागरिकांनीही या कामाबद्दल समाधान व्यक्त करून परेश ठाकूर यांचे पाठपुरावा केल्याबद्दल आभार मानले. या वेळी प्रवीण मोहोकर, यशवंत जाधव, रजनीश जाधव, तानाजी झुगे, संतोष जाधव, गजानन जाधव यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# काँग्रेसचे अरविंदर सिंह लवली भाजपत

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष अरविंद सिंह लवली यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर शनिवारी (दि. ४) सहकाऱ्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, दिल्ली प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा उपस्थित होते.



देशाच्या विकासात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करू इच्छित आहेत, असे लवली यांनी म्हटले आहे.

# ट्रेनच्या धडकेने एकाचा मृत्यू



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील नवघर गावाच्या हद्दीत शनिवारी पहाटे रेल्वे ट्रॅकवर लोकल ट्रेनच्या धडकेने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची खबर रेल्वे पोलिसांनी दिल्यानंतर त्या ठिकाणहून प्रेत मूळ रस्त्यावर आणून पुढील प्रोसिजर करण्याकरिता अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी टीमची मदत मागितली गेली. त्यानुसार टीमने प्रेत ॲम्बुलन्समधून खोपोली नगरपालिका रुग्णालयात आणले.

मृत व्यक्ती त्या ठिकाणी एवढ्या रात्री का गेली हा संभ्रम आहे? ती व्यक्ती स्थानिक आहे का? या अँगलने चौकशी सुरू आहे. या ठिकाणच्या आजूबाजूस मोठ्या प्रमाणात क्वारी कामगार राहत असल्याने त्या आशंकेने शोध सुरू आहे. प्रेताच्या अंगावर कोणतेच ओळखीचे साधन नाही. त्या व्यक्तीचा मृत्यू हा अपघाताने झाला की आत्महत्या केली याबद्दलही आशंका आहे.

आजूबाजूच्या परिसरात जर कोणास मृत व्यक्ती सदृष्य कोणी व्यक्ती आढळून येत नसल्यास त्यांनी थेट कर्जत–खोपोली रेल्वे स्टेशन किंवा रेल्वे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# नवी मुंबईत रंगणार कार्टून महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतातील सुप्रसिद्ध व्यंगचित्रकारांनी काढलेल्या १५० वर्षांपुर्वीची इतिहास घडविणारी दुर्मीळ व्यंगचित्रे पाहण्याची अनोखी संधी नवी मुंबईकरांना मिळणार आहे. इतकेच नाही तर राजकीय घडामोडीपासून ते समाज प्रबोधनात्मक ९२ नामवंत व्यंगचित्रकारांनी रेखाटलेल्या कार्टुन व्यंगचित्र दर्शना बरोबरच प्रदर्शन, पुस्तक प्रकाशन, प्रात्यक्षिक, चर्चा आणि मार्गदर्शन व स्वत:चे कार्टुन काढून घेता येणार आहेत.

कार्टूनिस्ट्स् कम्बाईन, मराठी साहित्य, संस्कृती व कला मंडळ, प्रा.माणिकराव कीर्तने वाचनालय आणि महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ५ व ६ मे रोजी कार्टून महोत्सव–२०२४ चे आयोजन वाशीतील साहित्य मंदिर सभागृहात करण्यात आले आहे.सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत महोत्सव नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

५ मे रोजी जागतिक व्यंगचित्रकार दिनी सकाळी १० वाजता या महोत्सवाचे उद्घाटन, ११ वाजता युरोपातील व्यंगत्रिकलेच्या संग्रहालयांना भेटी देऊन आलेले प्रशांत कुलकर्णी यांचे अनुभव कथन, १२ वाजता चारुहास पंडित यांचे कॉमिक्स ते चित्रपट प्रवास वर्णन, दुपारी १ वाजता कॅलिग्राफर गजानन घोंगडे यांचे ‘घोंगडे की दुनिया‘मधून अनुभव कथन, २ वाजता अतुल पुरंदरे यांचे चित्रकला ते व्यंगचित्रकलेचा अतुलनीय प्रवास सादरीकरण, ३ वाजता युरोपासह इतरत्र भटकंती करणारे प्रभाकर वाईरकर यांचे व्यंगचित्रकलेच्या जगात मार्गदर्शन आणि ४ वाजता पुणे विद्यापीठातील व्यंगचित्र संग्रहालय प्रमुख डॉ. प्रिया गोहाड यांचे ‘कार्टून म्युझियम बनवताना’ मधून अनुभव नागरिकांना ऐकता येणार आहे. तर ६ मे रोजी सकाळी १० चित्रकार उमेश कवळे ‘चित्रकला की व्यंगचित्रकला’ क्षेत्रातील कसरतीवर व्याख्यान, ११ वाजता विवेक प्रभूकेळुस्कर हे व्यंगचित्रकला म्हणजे काय रे भाऊ? या विषयी आपल्या मिश्किल शैलीतून मार्गदर्शन करती तर दुपारी २ वाजता व्यंगचित्रकारांची आपापसात खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा सत्र होणार आहे.

या कार्टून महोत्सव दुर्मीळ व नव्या पिढीतील व्यंगचित्र पाहण्याचा आणि विविध मान्यवरांचे अनुभव ऐकण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक संजय मिस्त्री (अध्यक्ष–कार्टूनिस्ट्स् कम्बाईन) आणि सुभाष कुलकर्णी (अध्यक्ष–मराठी साहित्य, संस्कृती व कला मंडळ, वाशी) यांनी केले आहे.

# पाच वर्षांत सर्व भ्रष्टाचाऱ्यांवर कडक कारवाई होणार –पंतप्रधान मोदी

**झारखंड : वृत्तसंस्था**

जिथे सरकारे भ्रष्ट असतात तिथे निधीची कितीही तरतूद केली तरी विकास शक्य नाही, म्हणूनच आम्ही भ्रष्टाचार हटविण्याचा संकल्प करतो, तेव्हा इंडी आघाडीचे लोक भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी मोर्चे काढतात. येत्या पाच वर्षांत अशा सर्व भ्रष्ट लोकांवर वेगाने कडक कारवाई केली जाईल, आणि भ्रष्टाचार खणून काढला जाईल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी झारखंडमधील पलामू आणि लोहरदगा येथे आयोजित केलेल्या विशाल जाहीर विजय संकल्प सभांमध्ये बोलताना दिली.



झारखंड भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री. बाबूलाल मरांडी, झारखंडचे विरोधी पक्षनेते व ज्येष्ठ नेते अमर कुमार बाउरी, विद्यमान खासदार व पलामूचे उमेदवार विष्णू दयाल राम, राज्यसभा खासदार सुदर्शन भगत, लोहरदगा उमेदवार व भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष समीर उरांव, आजसू पक्षाचे अध्यक्ष सुदेश महतो आणि इतर नेते यावेळी मंचावर उपस्थित होते.

आपल्या तडाखेबंद भाषणात पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा काँग्रेस आणि इंडीया आघाडीवर जोरदार शरसंधान केले. इंडीया आघाडीचे नेते जनहित आणि विकासाच्या मागणीसाठी नव्हे तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी रॅली काढतात, असे सांगून ते म्हणाले की, काँग्रेसने गेल्या ६० वर्षांत केवळ घराणेशाही, भ्रष्टाचार आणि तुष्टीकरण केले आहे. काँग्रेसच्या डावपेचांनी देशाला नक्षलवाद आणि माओवादाच्या रक्तरंजित हिंसेचा तडाखा दिला, पण आम्ही सत्तेवर आल्यानंतर देशाचा मोठा भाग माओवाद्यांच्या हिंसेतून मुक्त केला. आपली मते वाचवण्यासाठी काँग्रेस दहशतवाद्यांवर कारवाईही करत नाही, असा आरोपही पंतप्रधान मोदी यांनी केला.

आज पाकिस्तानचे नेते काँग्रेसच्या राजपुत्राला पंतप्रधान बनवण्याची प्रार्थना करत आहेत, पण सशक्त भारताला आता मजबूत सरकार हवे आहे आणि मजबूत सरकारसाठी मोदी सरकार हवे, ही देशाच्या जनतेची भावना आहे, असेही ते म्हणाले.

देशात धर्माच्या आधारावर आरक्षण कधीही दिले जाणार नाही, असे संविधानकर्त्यांनी ठरविले होते, पण काँग्रेस–झामुमो आणि राजदसह संपूर्ण इंडीया आघाडी आदिवासी, मागासवर्गीय आणि दलितांच्या आरक्षणावर दरोडा घालत असून विशिष्ट वर्गाला धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा त्यांचा इरादा आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या या घोषणेला राजद आणि झामुमोची स्पष्ट संमती असली तरी मोदी जिवंत असेपर्यंत दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींच्या आरक्षणाला कोणी हात लावू शकणार नाही, संविधानाशी छेडछाड करू शकणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# माजी मंत्री गंगाधर गाडे यांचे निधन



**अमरावती :** आंबेडकर चळवळीतील नेते, पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी राज्यमंत्री गंगाधर सुखदेव गाडे (वय ७६) यांचे शनिवारी (दि. ४) निधन झाले. त्यांचे पार्थिव रविवार (दि. ५) दुपारी १२ ते ४ या वेळेत संभाजीनगरातील उस्मानपुरा पीर बाजार येथील त्यांच्या नागसेन विद्यालयाच्या प्रांगणात दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

गंगाधर गाडे यांचे मूळ गाव कवठळ (ता. मोर्शी, जि. अमरावती) हे आहे. रिपब्लिकन स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडियाची त्यांनी स्थापन केली. गंगाधर गाडे यांनी आंबेडकरी प्रवक्ते म. भी. चिटणीस यांच्या साक्षीने पँथरची नव्याने सुरुवात केली. गंगाधर गाडे हे २७ ऑक्टोबर ९९ ते २७ एप्रिल २००० असे सहा महिने परिवहन खात्याचे राज्यमंत्री होते.

# बीस साल बाद...

## श्रवणीय संगीताच्या वेष्टनातील भयपट

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



बेकरार कर के हमे यू न जाईये (पार्श्वगायक हेमंतकुमार)
कहीं दीप जले कही दिल (लता मंगेशकर)
जरा नजरों से कहदो जी निशाना चूक न जाऐ (हेमंतकुमार)
ये मोहब्बत मेरी दुनिया मे (लता मंगेशकर)
सपने सुहाने लडक पन के (लता मंगेशकर)

ही अतिशय मधुर आवाजातील गाणी आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने यू ट्यूबवर पाहिली अथवा ऐकली तर त्यांचा समज होईल की एखाद्या जुन्या प्रेमपटातील ही अतिशय गोड गाणी आहेत. त्यात मनस्वी अशा पद्धतीने प्रियकर आणि प्रेयसीने अतिशय उत्कटपणे प्रेम भावना व्यक्त केल्या आहेत. शकील बदायुनी लिखित या गाण्यांना हेमंतकुमार यांचे संगीत आहे.

या प्रेम भावनाच आहेत, पण रहस्यरंजक सायकॉलॉजिकल थ्रीलर बीस साल बाद ( मुंबई रिलीज ४ मे १९६२) या चित्रपटातील आहेत. चित्रपटाच्या भाषेत सांगायच तर हा भूतपट होता.

बीरेन नाग दिग्दर्शित आणि हेमंतकुमार निर्मित या चित्रपटाचे थोडक्यात मध्यवर्ती सूत्र असे, उत्तर भारतातील दूरवरच्या एका चंदनघाट गावातील जमीनदार ठाकूरची एका युवतीवर बुरी नजर असते. दुर्दैवाने ती त्याच्या हवसची शिकार बनते. त्यातून ती आत्महत्या करते. त्यामुळे संपूर्ण गाव हादरते. काही दिवसांतच त्या ठाकूरचेही दुर्दैवाने निधन होते. तेव्हा चंदनघाटमध्ये खबर पसरते, त्याच्या वासनेची शिकार झालेल्या युवतीच्या आत्म्याने हा सूड घेतला. तिचा आत्मा गावात फिरतोय. यावरून गावात दंतकथा पसरतात. त्या एका पिढीतून पुढील पिढीत जात राहतात.

बीस साल बाद त्या ठाकूरचा नातू कुमार विजयसिंग (विश्वजीत) ही केवळ दंतकथा आहे, यात काहीही तत्थ नाही हे चंदनघाटला समजावून सांगण्यात अगदी प्रयत्नपूर्वक यशस्वी ठरतो आणि हे करत असतानाच त्याचे राधाशी (वहिदा रेहमान) प्रेम प्रकरण जुळते. फ्लॅशबॅकने हा चित्रपट घडतो. चित्रपटात मनमोहन कृष्ण, मदन पुरी, असित सेन, सज्जन यांच्याशी प्रमुख भूमिका आहेत.

कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट चित्रपटाचा आपला एक रंग असतोच. आणि त्याचा भयपटात भारी उपयोग करता येई. विशेषत: फक्त सावलीच चालतेय ही गोष्ट कुतूहल निर्माण करे.

या चित्रपटाला तब्बल बासष्ट वर्ष पूर्ण होत आहेत. तरी बीस साल बाद म्हणताच रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर हा भयपट येतो आणि त्यातील लोकप्रिय गाणीही ओठांवर येतात. निर्माता व दिग्दर्शक राजकुमार कोहली यांनीही बीस साल बाद (१९८८) नावाने भयपट पडद्यावर आणला. मिथुन चक्रवर्ती, डिंपल व मीनाक्षी शेषाद्री यांच्या भूमिका असलेल्या या चित्रपटाची वेगळ्या अर्थाने भीती वाटली. हा सगळाच आभासाचा खेळ होता. न जमलेला, न रंगलेला.

बीरेन नाग हे साठच्या दशकातील कल्पक कला दिग्दर्शक. प्यासा (१९५७), काला पानी (१९५८), चौदहवी का चांद (१९६०), 'साहेब बीवी और गुलाम (१९६२) या चित्रपटांचे कला दिग्दर्शन त्यांचेच. हे क्लासिक चित्रपट तुम्ही पाहिले असल्यास त्यातील कला दिग्दर्शकाची कल्पकता, बोलके सेट्स आणि बीरेन नाग यांना अतिशय उत्तम दिग्दर्शकांबरोबर काम करण्याची मोलाची संधी व ते सर्व करीत असतानाच चित्रपट या दृश्य माध्यमाची आवड व बरेच काही शिकण्याची मिळालेली संधी यांची कल्पना आली असलेच. अशा गुणी दिग्दर्शकाची सावलीही बरेच काही शिकवते. बीरेन नाग यांनी याच मुरब्बी दिग्दर्शकांच्या सहवासात राहून दिग्दर्शनात स्वतंत्र पाऊल टाकताच 'बीस साल बाद'मध्ये कला दिग्दर्शन (ते आता जी. एल. जाधव यांचे आहे) व छायाचित्रण (ते मार्शल ब्रगेन्झा) यांचा उत्तम वापर करून घेतला. पटकथा ध्रूव चटर्जी यांची तर संवाद देव किशनचे आहेत.

चित्रपटाच्या नाव व पोस्टरवरुन हा भयपट असल्याचे आपल्या डोक्यात फिट्ट असल्यानेच चित्रपटाची सुरुवात खूपच महत्त्वाची होती (सुरुवात चुकवू नका. शेवट कोणाला सांगू नका असं फार पूर्वी वृत्तपत्रातील चित्रपटाच्या जाहिरातीत ठळकपणे दिलेले असे आणि त्या काळातील चित्रपट व्यसनी त्या सूचनेचे तंतोतंत पालन करीत. यालाच चित्रपटावरचे प्रेम म्हणतात. त्यानेच अनेक अडथळे, आव्हाने इत्यादींवर मात करीत आपल्या देशात चित्रपट जगवला. रुजवला.)




'बीस साल बाद 'ची सुरुवात किर्र किर्र अशा आवाजात रात्रीतून होते. एक मध्यमवयीन माणूस हातात दिवा घेऊन झाडाझुडपातून जात जात काहीतरी शोधतोय, तेवढ्यात तो पाठमोरा होतो आणि त्याच्यावर भली मोठी नखे झडप घालतात. त्यात तो मृत्यूमुखी पडतो (पिक्चरची सुरुवातच अशी दचकावून सोडणारी) आणि एका बंद दरवाजाच्या गाडीतून त्याचा मृतदेह नेला जातो आणि पडद्यावर शीर्षक सुरू होतात, गीतांजली पिक्चर्स प्रस्तुत बीस साल बाद... मुंबईत मेन थिएटर इंपिरियलला हा चित्रपट ज्युबिली हिट ठरला. याचं कारण चित्रपटाची थीम, त्याची वेधक मांडणी (चित्रपटात आपल्याला चकवा बर्याचदा मिळतो) आणि लोकप्रिय गीत संगीत.

साठच्या दशकातील हा चित्रपट रिपीट रन, मॅटीनी शोला सतत प्रदर्शित होत होत सत्तरच्या दशकातही आला. एखादी कलाकृती काळासोबत पुढे जात जात राहणे हेदेखील यशच. मी सत्तरच्या दशकात रॉक्सीत मॅटीनी शोला पाहिला. तोपर्यंत प्रसारमाध्यमांतून 'फ्लॅशबॅक', 'वो दिन याद करो', 'गुजरा हुआ जमाना', 'घुंघट के पट खोल' अशा जुन्या काळातील चित्रपटाच्या सदरातून 'बीस साल बाद' दिसत होता. थोडासा स्पष्ट होत होता. वाचनातून चित्रपट दिसत राहणे असेही पूर्वी होत असे. चित्रपटविषयक वाचनाचेही रंग अनेक. रेडिओवरील 'भुले बिसरे गीत' यासारख्या जुन्या गाण्याच्या कार्यक्रमातून बेकरार कर के हमे यू न जाईये, जरा नजरो से कह दो जी वगैरे मुलायम आवाजातील गोड गाणी ऐकत होतो. त्या काळात असे रहस्यरंजक जुने चित्रपट मॅटीनी शोला रिलीज करण्याचा आणि आम्ही कॉलेज युवकांनी सस्पेन्स थ्रीलर चित्रपट एन्जॉय करण्यात वेगळीच गंमत असे. पडद्यावर पिक्चर सुरू असतानाच आम्ही 'खरा खुनी कोण अथवा खरा गुन्हेगार कोण' यावर हळू आवाजात कुजबुज करीत अंदाज बांधत असू आणि क्लायमॅक्सला काही भलताच सस्पेन्स दिसला की दिग्दर्शन भारी होते असेच प्रमाणपत्र देऊन आम्ही मोकळे होऊ.




'बीस साल बाद'च्या यशानंतर बीरेन नागने कोहरा (१९६४) या भयपटाचे दिग्दर्शन केले. त्याबरोबरच त्याचे कला दिग्दर्शनही सुरू होतेच. अमरजीत दिग्दर्शित 'हम दोनो' (१९६२), विजय आनंद दिग्दर्शित 'तेरे घर के सामने'चे (१९६३) कला दिग्दर्शन त्याचेच. तेरे घर के...साठीचा त्याने लावलेला दिल्लीतील कुतुबमिनारचा अप्रतिम व हुबेहुब सेट आणि त्यातीलच देव आनंद व नूतनवरचे दिल का भंवर करे पुकार हे गाणे सगळचं कसे छान व क्लासिक.

दुर्दैवाने बीरेन नागचे वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षी निधन झाले. अन्यथा त्यांनी बीस साल बाद, कोहरा असे कल्पक भयपट नक्कीच दिग्दर्शित केले असते.

'बीस साल बाद' त्यातील लोकप्रिय गीत संगीताने आजही लोकप्रिय आहे. या नावातच त्याची खरी ओळख आहे. यू ट्यूबवर एकदा पहा तर खरे, मोनो साऊंड सिस्टीम असूनही चित्रपट छान रंगतो. तेच तर महत्त्वाचे असते. सत्तरच्या दशकातील अनेक रहस्यरंजक चित्रपट त्या काळात आवर्जून पाहिले गेले... त्यात एक होता बीस साल बाद आणि त्यातच एक चित्रपट आला बीस साल पहले... हिट पिक्चरच्याच नावासारखंच आपल्याही पिक्चरचं नाव असावे हीदेखील एक फिल्मी मानसिकता. चित्रपटाच्या जगातील अशा छोट्या छोट्या गोष्टी अगणित.

बीस साल बाद हा विश्वजीतचा पहिला चित्रपट. म्हणजे त्याच्या कारकिर्दीलाही बासष्ट वर्ष झालीदेखील. त्यातील पहिली दहा वर्ष तो टिकून होता हे विशेष आणि मग 'बीस साल बाद' वगैरे आपल्याच चित्रपटातील गाण्याचा त्याने ऑर्केस्ट्रा काढून त्यात तो गायक झाला आणि बरेच दौरे केले, त्यात शो केले. काही वर्षांपूर्वी एका फिल्मी इव्हेन्टसमध्ये त्याची भेट झाली असता तो बराच फिट्ट वाटला. यावरून त्याला दाद द्यायलाच हवी.

एव्हाना विश्वजीत म्हटल्यावर चित्रपट रसिकांच्या एका पिढीला पटकन बेकरार करके हमे यू न जाईये..., 'जरा नजरों से कहदो तो...' (बीस साल बाद), 'पुकारता चला हू मै...', 'मेरे हमदम मान भी जाओ, भला मानो बुरा मानो...' (मेरे सनम), 'मेरी मोहब्बत पाक मोहब्बत, आ गले लग जा...' (एप्रिल फूल), 'नजर ना लग जाऐ, अकेला हू मै...' (जाल), तुम्हारी नजर क्यू खफा हो गई... (दो कलिया), लाखों है यहा दिलवाले..., आँखो मे कयामत के काजल... (किस्मत), मुझको ठंग लग रही है मुझसे दूर तू न जा... (मै सुंदर हू) अशी साठच्या दशकातील सहज गुणगुणावी अशी गाणी ओठांवर आली असतील. तो काळ श्रवणीय गीत संगीताचा. आणि त्याचा लाभ अशा अनेक नायकांनाही.

विश्वजीत म्हटल्यावर काहींना वहिदा रेहमान (कोहरा), आशा पारेख (मेरे सनम), सायरा बानू (एप्रिल फूल), शर्मिला टागोर (यह रात फिर न आयेगी), माला सिन्हा (नाईट इन लंडन, जाल, दो कलिया), साधना (इश्क पर जोर नहीं), मुमताज (शरारत), बबिता (किस्मत), लीना चंदावरकर (मै सुंदर हूँ), रेखा (दो आँखे, दो शिकारी, अंजाना सफर, कहते है मुझको राजा, मेहमान) अशा आघाडीचा अभिनेत्रींचा तो नायक झाला असा इतका तो भाग्यवान होता हे आठवले असेल. काय भारी प्रगती पुस्तक आहे ना?


चवीचवीने फिल्मी गॉसिप्समध्ये विशेष रस वा रूची घेणाऱ्यांना 'अंजाना सफर'च्या सेटवर कोणाच्याही ध्यानीमनी नसताना अचानक त्याने रेखाचे चुंबन घेऊन एकच खळबळ उडवून दिली हे आठवले असेल. आजही हा किस्सा गाजतो. पन्नास-बावन्न वर्षांपूर्वी भरल्या सेटवर असं काही करणे म्हणजे भारीच डेअरिंगचे काम होते. कोण होतास तू काय केलेस तू असेही कोणी म्हटलं.

याच गडबडीत विश्वजीतने 'कहते है मुझको राजा' या चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शनही केले. नायकही तोच हे वेगळे सांगायलाच नको. आणि नायिका चक्क रेखा, पण पिक्चर फ्लॉप, कारण विश्वजीत आता चलनी नाणे नव्हता. मग त्याने 'रॉकी' नावाच्या चित्रपटाची घोषणा केली. ट्रेड पेपर्समध्ये जाहिरात दिली. प्रमुख भूमिकेत अमिताभ बच्चन व रेखा. एका गोष्टीचे उत्तर कधीच मिळाले नाही, रेखाच्या गुड बॉक्समध्ये विश्वजीत कसा आणि का? हा चित्रपट घोषणेपलिकडे गेलाच नाही, पण सुनील दत्तने काही वर्षांनी संजय दत्तसाठी 'रॉकी' हे नाव विश्वजीतकडून घेतले.

नायक म्हणून सद्दी संपल्यावर विश्वजीतने आनंद और आनंद, जिगरवाला, साहेब, अल्लारखा वगैरे चित्रपटात चरित्र भूमिका साकारल्या. एव्हाना चित्रपट रसिकांची आणि मीडियातीलही पिढी बदलली होती. त्यांना काय माहीत साठच्या दशकात विश्वजीत टॉपच्या अभिनेत्रींचा हीरो होता आणि त्याची सुरुवात बीस साल बाद ने झाली...

# बालकवी अर्थात त्र्यंबक ठोंबरे

त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ बालकवी हे मराठीतील एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी. त्यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे १३ ऑगस्ट १८९० रोजी झाला. बालकवींच्या वडिलांची पोलीस खात्यातील नोकरी फिरतीची असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाची आबाळ झाली. एरंडोल, यावल, जामनेर, बेटावद अशा निरनिराळ्या ठिकाणी त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. धुळे येथील प्रिपरेटरी स्कूल आणि अहमदनगर येथील अमेरिकन मिशन हायस्कूल या शाळांत त्यांचे इंग्रजी शिक्षण झाले. तेही सलगपणे नव्हे. देशभक्तीच्या तत्कालीन कल्पनांच्या प्रभावामुळे बालकवींना तसेच त्यांच्या वडिलांना इंग्रजी शिक्षणाबाबत उत्साह नव्हता. त्यामुळे बराचसा अभ्यास घरीच झाला. बालकवींची वडील बहीण जिजी हिने त्यांना संस्कृताचे आरंभीचे पाठ दिले. कवितेची गोडीही तिनेच लाविली. पुढे संस्कृत भाषेवर पुढे त्यांनी प्रभूत्व मिळविले.



त्र्यंबक ठोंबरे यांनी पंडिती कविता आणि शाहिरी कविता यांचा समरस होऊन व्यासंग केला होता. इंग्रजी कवितेचे त्यांचे वाचन मर्यादित असले तरी इंग्रजी कवितेची त्यांची समज उत्तम होती. अहमदनगरच्या मिशन स्कूलमध्ये तसेच महाबळेश्वर येथील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या एका शाळेत काही काळ ते अध्यापक होते.

वयाच्या तेराव्या वर्षी नवापूर येथे असताना त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. या कवितेला त्यांनी शीर्षक दिलेले नव्हते (तथापि बालकवींच्या समग्र कवितेचे संपादक प्रा. भा. ल.पाटणकर यांनी तिला 'वनमुकुंद' असे नाव दिलेले आहे). कवितेच्या लयीची जाणीव, निसर्गप्रेम, श्रद्धा ही बालकवींच्या कवितेची काही लक्षणीय वैशिष्टै त्यांच्या या पहिल्या कवितेत बीजरूपाने जाणवतात. पुढे तीन-चार वर्षांत त्यांची कविता अधिकाधिक विकसत गेली आणि जळगाव येथे भरलेल्या पहिल्या मराठी कविसंमेलनात (१९०७) त्यांनी केलेल्या काव्यवाचनामुळे प्रभावित होऊन संमेलनाध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी त्यांना 'बालकवी' हे नाव देऊन त्यांचा गौरव केला. त्यानंतर लवकरच मराठीतील श्रेष्ठ कवी म्हणून त्यांचा लौकिक झाला 'बालकवी' हे नावही रूढ झाले.

बालकवींची विशेष ख्याती आहे ती निसर्गकवी म्हणून, किंबहुना त्यांच्या बहुतेक कवितांत निसर्ग मध्यवर्ती आहे. त्यांच्या काही नामांकित कवितांची शीर्षकेच पाहा : 'निर्झरास', 'फुलराणी', 'संध्या-रजनी', 'अरुण', पण रूढ अर्थाने निसर्गसौंदर्याचे वर्णन हा अशा कवितांचा हेतू नाही. निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या कविमनाचे ते सहजोद्गार आहेत. निसर्गातील विविध दृश्यांत त्यांना मानवी भावना दिसतात. म्हणजे हे निसर्गाचे मानवीकरण नाही किंवा अचेतन वस्तूंवर चेतनारोप नाही. 'फुलराणी'तील एक कलिका आणि सूर्यकिरण यांची नाजुक प्रीतिकथा या दृष्टीने लक्षणीय आहे. ती जेवढी अतिमानवी तेवढीच मानवी आहे. 'अरुण'मध्ये पहाट फुटते या घटनेभोवती कल्पनाशक्तीच्या विभ्रमांचे भान हरविणारे जाळे विणले आहे, पण त्या केवळ उत्प्रेक्षा नव्हेत. त्या घटनेत भाग घेणाऱ्या निसर्गातील विविध गोष्टी तेथे सजीव होतात. इतकेच नव्हे; तर कवितेच्या किमयेने रसिकही त्यांच्यशी एकरूप होतो. त्यांमागील दिव्य आणि मंगल यांच्या जाणिवेतून अपूर्णजगातील पूर्णतेचा आणि पृथ्वी व स्वर्ग यांच्यातील बंधाचा साक्षात्कार होतो. लौकिक सौंदर्याला अनेकदा त्यांच्या कवितेत अलौकिकाचा स्पर्श होतो. साध्या वर्णनात प्रतीकाची गहिरी सूचना लपलेली असते. 'औदुंबर' ही त्यांची छोटीशी कविता बहुचर्चित ठरली ती यामुळेच (आलोचना मासिक फेब्रुवारी १९८०).

विषयाशी असे तादात्म्य ज्या संवेदनाशक्तीमुळे बालकवींना साध्य होऊ शकले ती आधुनिक मराठी कवितेत काहीशी अनोखी होती. पुढे बा.सी. मर्ढेकर यांनी तिच्याकडे आवर्जून लक्ष वेधले. मर्ढेकरांच्या स्वतःच्या कवितेवर बालकवींचा मोठा प्रभाव होता. त्यांच्या आरंभीच्या कवितेवर तो स्पष्टपणे दिसतोच, पण त्यांनी नंतर लिहिलेल्या आणि वरवर फार वेगळ्या वाटणाऱ्या त्यांच्या नवकवितेतही सूक्ष्म दृष्टीला त्याचा आढळ होईल. अगदी अलीकडच्या ग्रेस आणि ना.धों. महानोर यांसारख्या परस्परांहू वेगळ्या प्रकृतीच्या कवींच्या घडणीतही बालकवींचा भाग जाणवेल, किंबहुना विशुद्ध कवितेचा गेल्या तीस-पस्तीस वर्षांत जो कमी-अधिक आविष्कार निरनिराळ्या कवींत दिसला त्याच्याशी बालकवींचा अन्वय दुरून किंवा जवळून लावता येईल. अर्थात नादमाधुर्य, निसर्गातील कोमल तपशिलांचे नाजुक वर्णन इ. बालकवींच्या प्रसिद्ध वैशिष्ट्यांचे पुष्कळ अनुकरण झाले, पण असे कवी अनुकरणापार गेले नाहीत. त्यांची संवेदना तेवढी तरल आणि समृद्ध नव्हती.


बालकवींना केशवसुतांच्या परंपरेत बसवले जाते, पण ते तारतम्याने करायला हवे. केशवसुतांचे संस्कार त्या कालखंडातील इतर बहुतेक प्रमुख कवींप्रमाणे बालकवींवरही झाले होतेच. 'धर्मवीर'सारख्या त्यांच्या काही कवितांचे विषय आणि त्यांतील विचार, केशवसुती वळणाचे होते, पण या कविता त्यांच्या उत्तम कवितांपैकी नव्हेत. बालकवींचा पिंडच निराळा होता.

बालकवी म्हणजे केवळ 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबून' घेण्याचा ध्यास लागलेले स्वप्नाळू, निरागस बालवृत्तीचे कवी नव्हेत. त्यांच्या उत्तर आयुष्यातील काही कवितांचा सूर अगदी निराळा आहे. बालभावाने बांधलेली आणि जोपासलेली स्वप्नसृष्टी काजळत आणि कोलमडत आहे या दुःखाची तडफड 'कविबाळे' या कवितेत आहे. सृष्टीची खिन्न, उजाड रुपे त्यांच्या मनाला घेरताना दिसतात. 'काय बोचते ते समजेना, हृदयाच्या अंतर्हृदयाला' अशी जीवघेणी अस्वस्थता त्यांना विफल करते कोठे मृत्यूची सावली तरळत असते. 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे' म्हणून बागडणाऱ्या बालकवींइतकेच हे त्यांच्या 'पारव्या'प्रमाणे खिन्न, नीरस एकांतगीत गाणारे-बालकवी खरे आहेत.

बालकवींनी काही बालगीतेही लिहिली त्यांतील गीतगुण सहजसुंदर आहे आणि बालवृत्तीही. त्यातील पक्ष्यांविषयीची गीते विशेष सुंदर आहेत. बालकवींच्या सर्वच कवितांच्या रचनेतील नादमयता आणि चित्रगुण अकृत्रिम आणि असामान्य आहेत. जळगावजवळील भादली स्टेशनपाशी रेल्वेचे रूळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून बालकवींना ५ मे १९१८ रोजी मरण आले. (साभार : मराठी विश्वकोष)

# गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे

महाराष्ट्रातील थोर गायक अशी पं. रामकृष्णबुवा वझे यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म सावंतवाडी संस्थानातील ओझरे गावी २८ नोव्हेंबर १८७२ रोजी झाला. ते दहा महिन्यांचे असतानाच त्यांचे वडील वारले. पुढे त्यांची आई त्यांना घेऊन कागल येथे आली आणि मोलमजुरी करू लागली. त्यांचे बालपण फार कष्टात व हालअपेष्टांत गेले. जेमतेम मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. लहानपणापासून बुवांना गाण्याचा नाद होता. त्यामुळे कागलचे गायक बळवंतराव पोहरे यांच्याकडे त्यांचे गाण्याचे प्राथमिक शिक्षण झाले. नंतर ते मालवणला गेले आणि वर्षभर विठोबाआण्णा हडप यांच्याकडे तालीम घेतली.



वयाच्या बाराव्या वर्षी रामकृष्णबुवांचे लग्न झाले. त्यानंतर गवई होण्याच्या तीव्र इच्छेपोटी त्यांनी घर सोडले व पायी प्रवास करून इंदूर गाठले. तेथे सुप्रसिद्ध पखवाज वादक नानासाहेब पानसे यांच्याकडे ते राहिले. गाणे शिकण्याची रामकृष्णबुवांची जिद्द जाणून पानसे यांनी त्यांना ग्वाल्हेरला जाण्यास सांगितले. बुवा ग्वाल्हेरला आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध उस्ताद निसार हुसेनखाँ यांच्याकडे गाणे शिकू लागले. माधुकरी मागून अत्यंत कष्टाने व जेथून जे मिळेल तेथून ते घ्यायचे अशा वृत्तीने त्यांनी ग्वाल्हेरला गानविद्या संपादन केली व नंतर लौकिक मिळविण्यासाठी ते बाहेर पडले.

स्वामी विवेकानंद यांच्या सहवासात वझेबुवा पंधरा दिवस राहिले होते. अनेक गवयांचाही त्यांनी सहवास केला. गाणे ऐकावयाचे व प्रसिद्ध कलावंतांची सेवा करून विद्या मिळवायची अशी त्यांची वृत्ती होती. गायक म्हणून नेपाळला ते एक वर्षभर होते. आपल्या भ्रमणात ते अनेक कलावंतांना ऐकून शक्य तेथे त्यांच्याकडून बंदिशी मिळवत व संग्रह करीत आपली विद्या संपन्न करीत होते. बारा वर्षानंतर ते परत आपल्या गावी आले. काही वर्षे गोव्यात राहून वझेबुवांनी अनेक शिष्य-शिष्या तयार केल्या. ते गाण्याच्या शिकवण्या करीत असत. बलवंत संगीत मंडळी आणि ललितकलादर्श या नाटकमंडळ्यांमध्ये ते संगीतगुरू म्हणून काही काळ राहिले. मुंबई, पुणे, धारवाड इ. अनेक ठिकाणी त्यांचे या तऱ्हेने वास्तव्य झाले. आयुष्याच्या अखेरीस ते पुण्यात स्थायिक झाले व तेथेच त्यांचे निधन झाले.

रामकृष्णबुवा वझे हे संगीतक्षेत्रात अत्यंत भरतीदार गवई, विद्वान, रंगतदार व बहुरंगी कलावंत असून 'गायनाचार्य' म्हणून मान्यता पावले होते. अनेक कलावंतांच्या सहवासामुळे त्यांनी स्वतःच्या गायकीचे एक वेगळेच वैशिष्ट्य निर्माण केले होते. त्यांचा आवाज बुलंद होता आणि लयदार आलापी, लडिवाळ बोलउपज आणि वजनदार ताना हे त्यांच्या गायकीचे वैशिष्ट्य होते. मराठी रंगभूमीला संगीत देऊन त्यांनी नाट्यसंगीतात मोलाची भर घातली. त्यांच्या संगीत कलाप्रकाश (१९३८) या पुस्तकात त्यांच्या काही चिजा समाविष्ट आहेत तसेच त्यांचे आत्मचरित्रही थोडक्यात दिले आहे. त्यांचे चिरंजीव शिवरामबुवा वझे, हरिभाऊ घांगरेकर, केशवराव भोसले, मा. दीनानाथ, बापूराव पेंढीरकर, भालचंद्र पेंढारकर, दन्नीबाई, तानीबाई, कागलकरबुवा वगैरे कलावंत मंडळींचा त्यांच्या शिष्यवर्गात समावेश होतो. रामकृष्णबुवांचे ५ मे १९४५ रोजी निधन झाले.

–वि.रा. आठवले

# पेणमध्ये गावठी हातभट्ट्या उद्ध्वस्त

## ▪ निगडे, पालखार आणि धाउळपाडा येथे जप्तीची कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील निगडे येथे हिरामण पांडुरंग नाईक (रा. निगडे पो. आमटेम ता. पेण) यांनी दोन हजार ७०० रुपये किमतीची आठ लिटर गावठी हातभटटीची तयार दारू बाळगल्याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात हवालदार आतिश कृष्णा गायकवाड यानी फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील निगडे येथे हिरामण पांडुरंग नाईक यांच्या घरासमोर असलेल्या आंब्याच्या झाडाजवळ मोकळ्या जागेत हिरामण पांडुरंग नाईक याने शासनाने प्रतिबंधित केलेली गावठी हातभटटीची तयार दारू स्वत:च्या ताबे कब्जात बाळगली



याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. ९५/२०२४ दारूबंदी अधिनियम, १९४९ इतर, दारूबंदी अधिनियम, १९४९ ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलिस हवालदार गीता मंगेश धुपकर हे करीत आहेत.

दुसरी घटना पालखार येथे हिरामण मोतीराम म्हात्रे (रा. पालखार ता. पेण) यांनी दोन हजार ४०० रुपये किमतीची ९ लिटर गावठी हातभटटीची तयार दारू बाळगल्याप्रकरणी वडखळ पोलिस ठाण्यात हवालदार प्रशांत प्रकाश देसाई यांनी फिर्याद दाखल केली आहे.

निगडे येथे हिरामण म्हात्रे याचे घराच्या पाठीमागे पश्चिमेस आंब्याच्या झाडाखाली आरोपीत याने शासनाने प्रतिबंधित केलेली गावठी हातभटटीची तयार दारू स्वत:चे ताबेकब्जात एकूण दोन हजार ४०० रुपये किमतीचे विनापरवाना बाळगळे स्थितीत मिळून आला. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार चवरकर ह्या करीत आहेत.

धाउळपाडा येथे सायली उर्फ छाया यशवंत म्हात्रे यांनी दोन हजार १०० रुपये किमतीची आठ लिटर गावठी हातभटटीची तयार दारू बाळगल्याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात महिला हवालदार तृप्ती जितेंद्र चवरकर यांनी फिर्याद दाखल केली आहे. धाउळपाडा येथे सायली उर्फ छाया यशवंत म्हात्रे यांच्या घराचे पाठीमागे भेंडीच्या झाडाखाली महिला आरोपी छाया म्हात्रे हिने शासनाने प्रतिबंधित केलेली गावठी हातभटटीची तयार दारू स्वत:चे ताबेकब्जात एकून दोन हजार १०० रुपये किमतीचे विनापरवाना बाळगल्याप्रकरणी स्थितीत मिळून आली.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.९६ /२०२४ दारूबंदी अधिनियम, १९४९ ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार नाईक हे करीत आहेत.

# अनंत गीतेंकडून कुणाला सहकार्य मिळणे अवघड

## मंत्री आदिती तटकरे यांचे टीकास्त्र



**पोलादपूर : प्रतिनिधी**

सहावेळा खासदार झालेल्या अनंत गीतेंकडून कोणास मदत सहकार्य अपेक्षित असेल तर त्यांचा मोबाईल नंबर, घरचा पत्ता शोधणे ही सर्वांत अवघड बाब असून त्यानंतर ते मदत करतील की नाही हे आणखी कठीण असेल. मात्र, खासदार तटकरे आणि कुटूंबियांचे नंबर पत्ता माहिती असल्याने अनेकांना सहकार्य प्राप्त झाले आहे. तुर्भे खुर्द येथील गावबैठकीमध्ये पंचक्रोशीमध्ये विरोधकांचे बूथही न लागण्याची अपेक्षा यावेळी ना. आदिती तटकरे यांनी व्यक्त केली.

या वेळी व्यासपिठावर राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, तालुका संघटिका सुवर्णा कदम, पोलादपूर उपनगराध्यक्ष नागेश पवार, नगरसेवक विनायक दिक्षित, मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर, दशरथ उतेकर, रामचंद्रदादा साळुंखे, रयतच्या तुर्भे न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन विश्वास उतेकर, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष विठोबा पार्टे, मधुकर उतेकर, अनिल भिलारे, अनिल पवार, रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सुदास मोरे गुरुजी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

या वेळी ना. अदिती तटकरे यांनी, सक्रीय खासदार विरोधात निष्क्रिय खासदार अशी लढत आहे. मोदींना जगात देशाला महासत्ता करण्यासाठी तर खासदार तटकरे यांना पुन्हा खासदार करण्यासाठी ही निवडणूक आहे. २०१९ ला नवस केला होता. खासदार तटकरे यांनी ग्रामदेवतेच्या मंदिराच्या जिर्णोध्दाराची भावना व्यक्त केली असल्यानेच त्यांच्या हातून नवस पुर्ण होईल. गीते हे पंचवार्षिक दौरा करतात. भयंकर नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत कुठे होते, त्यांना मतदानातून उत्तर देता येईल. आपल्याला सक्रिय खासदार निवडून द्यायचा आहे, असे या वेळी सांगितले.

या वेळी रयतच्या तुर्भे न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन विश्वास उतेकर यांनी, शाळेसाठी खासदार तटकरे यांनी १५ लाख रूपये देणगी दिली. ग्रामदेवतेच्या मंदिरामध्ये स्वत:च जीर्णोध्दार करण्याची भूमिका गाऱ्हाणे मांडताना खासदार तटकरे यांनी मांडली. या मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम पूर्ण व्हायचे असेल तर संपूर्ण तुर्भे खुर्द गावाने खासदार तटकरे यांच्या पाठिशी राहिले पाहिजे, अशी भुमिका स्पष्ट केली.

# मतदान जाहिरातींबाबत आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान पूर्व दिवशी तसेच मतदानादिवशी केवळ वर्तमान पत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मजकूर प्रसिध्दीच्या आधी प्रमाणिकरण करुन घेणे उमेदवारांना बंधनकारक आहे.

त्यासाठी आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत. भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेला नेक्चर २७ हा उमेदवार अथवा उमेदवारांने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचा अर्ज (अर्जावर स्वत: उमेदवाराची सही अथवा प्रतिनिधीची सही असल्यास त्याबाबत उमेदवाराचे प्रतिनिधी नियुक्त केलेले घोषणापत्र अर्जासोबत हवे), जाहिरात मजकुराची सोबत दोन प्रतीत, जाहिरात तयार करण्यासाठी आलेला खर्च व त्याचे देयक, जाहिरात कोणत्या वृत्तपत्रात प्रसिध्दीला देणार याबाबतची माहिती व त्याबाबतच्या संभाव्य खर्चाचा तपशील आवश्यक आहे.

मतदान पूर्व दिवशी तसेच मतदानादिवशी (म्हणजेचे दि. ६ मे व ७ मे रोजी) केवळ वर्तमान पत्रात करावयाच्या जाहिरातीचा मजकूर प्रसिध्दीच्या दोन दिवस आधी प्रमाणिकरण करुन घेणे बंधनकारक आहे. उमेदवारांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरातींच्या प्रमाणिकरणासाठी जिल्हा माहिती कार्यालयातील माध्यम कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

# महाडमध्ये दोन हजारांहून अधिक दिव्यांग बजावणार मतदानाचा हक्क

**महाड : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या तीसरा टप्पा जवळ आला असून प्रचाराच्या तोफा देखील थंड होत चालल्या आहेत. या तिसऱ्या टप्प्यात रायगड लोकसभा मतदारसंघाच्या महाड परिसरातून जवळपास दिव्यांग मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

रायगड लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीमध्ये चुरस आहे. या लढतीसाठी उमेदवार आणि प्रशासन देखील सज्ज झाले आहे. महाड तालुक्यातून शासकीय पातळीवर मतदान करण्याबाबत जनजागृती केली जात आहे. विविध माध्यमांच्या माध्यमातून हि जनजागृती केली जात असली तरी राज्यात आणि देशभरात झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मतदानाची टक्केवारी घसरली असल्याचे दिसून आले आहे. यामुळे शासनाने नवनवे पर्याय उभे केले आहेत. दिव्यांग, आणि वय वर्ष ८५ वर्षांवरील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरिता त्यांच्या घरीच जावून मतदान घेतले जात आहे. महाड तालुक्यात २४३ दिव्यांग, अंध, आणि वयोवृद्ध नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क घरीच बजावला आहे.

महाड तालुक्यात असलेल्या २,८१,७२१ मतदारांपैकी २२३१ हून अधिक दिव्यांग मतदारांची संख्या आहे. हे दिव्यांग मतदार प्रत्यक्ष मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत. याकरिता महाड पंचायत समितीच्या स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहात जनजागृती कार्यक्रम देखील घेण्यात आला. या वेळी उपस्थित दिव्यांगाना अधिकाधिक दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर त्यांना आवश्यक उपाययोजना केल्या आहेत, अशी माहिती तालुका प्रशासनाने दिली आहे. मतदान केंद्रांवर जिना, सायकल, सहाय्यक, आदी व्यवस्था केली जाणार आहे.

# बदनामीचा जाब विचारल्याने महिलेस मारहाण

**पेण : प्रतिनिधी**

आपली बदनामी केल्याचा जाब विचारण्याठी गेलेल्या महिलेस आरोपीने मारहाण केल्याची घटना हेटवणे परिसरात घडली आहे.

याबाबत माहिती अशी की, महिला फिर्यादी (रा.शिक्षक सोसायटी ता.पेण) यांचा मित्र आरोपी (रा.पेण) हा तिची बदनामी करीत असल्याचे फिर्यादीस मित्राकडुन समजल्यानंतर बुधवार १ मे रोजी रात्री ८:३०च्या सुमारास फिर्यादी या त्याबाबत हेटवणे डँमकडे जाणाऱ्या रोडवर आरोपीस विचारणा करण्यास गेल्या असताना त्या ठिकाणी आरोपी याने फिर्यादी यांच्या सोबत वाद घालुन भांडण करून फिर्यादीचे डोक्यात फाईट मारून दुखापत केली. त्यावेळी भांडणे सोडविण्यासाठी फिर्यादीचे मित्र आले असता आरोपी याने हातातील स्टिलच्या कड्याने मारून डाव्या डोळयावर व चेहऱ्यावर दुखापत केली.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार दुशंत जाधव हे करीत आहेत.

# शासकीय विश्रामगृह दुरुस्तीची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड हे पर्यटन स्थळ असून येथे मंत्रालयातील अनेक मान्यवर तसेच शासकीय अधिकारी यांची ये-जा करीत असतात, परंतु शासनाने बांधलेल्या शासकीय विश्राम गृह नसल्याने या सर्व अधिकारी वर्गाला स्वतःचे पैसे संपून खाजगी लॉजिंगमध्ये आसरा घ्यावा लागत आहे. त्यामुळे शासकीय विश्रामगृह दुरुस्त करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

कोविड १९ पासून मुरुडचे शासकीय विश्राम गृहाचा ताबा ग्रामीण रुग्णालयाने घेतला होता. कोरोनाच्या रुग्णांना इलाज करण्यासाठी सदरचे विश्राम गृह वापरात आणले जात होते. मागील चार वर्षांपेक्षा जास्त हे विश्राम गृह बंद ठेवण्यात आले असून याचा वापरच बंद करण्यात आला आहे. त्यामुळे मुरूडला भेटी देणारे



आमदार, खासदार यांना खासगी इमारतीमध्ये कार्यकर्त्यांच्या गाठी भेटी घ्याव्या लागत आहेत. मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विश्राम गृहाची दुरुस्ती व देखभाली कडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. समुद्र किनारी असणारे शासकीय विश्राम गृह सर्वांना आवडीचे व राहण्याची उत्तम व्यवस्था असणारे ठिकाण असूनदेखील सदरच्या विश्रामगृहाकडे दुर्लक्ष्य झाले आहे.

ऐन निवडणुकीत जिल्ह्या बाहेरील अधिकारी निवडणुकीचे काम करण्यासाठी येत असतात परंतु विश्राम गृह नसल्याने त्यांना सध्या खाजगी लॉजिंगचा आसरा घ्यावा लागत आहे. याबाबत मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याचे उप अभियंता रमेश गोरे यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अलिबाग येथील श्रीनाथ कन्स्ट्रक्शन अलिबाग याना देण्यात आले आहे. त्यांनी हे काम अद्याप सुरू न केल्याने त्यांना लेखी पत्र पाठवण्यात येणार असून लवकरात लवकर हे काम सुरू करण्याचे सांगण्यात आले आहे. या विश्रामगृहाचे दुरुस्ती व पेंटिंग तसेच इलेक्ट्रीकल काम सुद्धा करण्यात येणार आहे.

# 'संजोग वाघेरेंनी निष्ठेच्या गप्पा मारू नये'




**कर्जत : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीसाठी स्वतःचा पक्ष, स्वतः चा नेता सोडून दुसऱ्या पक्षात पळणारे संजोग वाघेरे हे वाघेरे नाहीत तर 'भागे रे' आहेत. लोकसभा तिकिटासाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात भागाभाग करणाऱ्या वाघेरे यांना तिकीट देण्याऐवजी उद्धव ठाकरे यांनी कोणत्याही सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी द्यायला हवी होती. आपल्या पक्षाशी गद्दारी करून दुसऱ्या पक्षाची उमेदवारी मिळवणाऱ्या वाघेरे यांनी निष्ठेच्या गप्पा मारू नये. निष्ठा काय असते ते त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्रीरंग बारणे यांच्याकडून शिकावे, असे परखड प्रतिपादन शिवसेनेच्या प्रवक्त्या प्रा. ज्योती वाघमारे यांनी येथे केले.

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी शिवसेनेच्या वतीने काल रात्री नेरळ येथील छत्रपती शिवाजी मैदानात आयोजित करण्यात आली होती. व्यासपीठावर उमेदवार श्रीरंग बारणे, कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, शिवसेनेच्या महिला संपर्कप्रमुख डॉ. शिल्पा देशमुख, कर्जत संपर्कप्रमुख विजय पाटील, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, तालुका प्रमुख संभाजी जगताप, शिवराम बदे, रमेश मते, दीपक पाटील आदी उपस्थित होते.

प्रा. वाघमारे यांनी त्यांच्या भाषणात उद्धव ठाकरे यांची ध्वनिफीत ऐकवली. शरद पवार, उद्धव ठाकरे या दोघांनाही आपापल्या मुलांना मुख्यमंत्री बनवायचे आहे. सोनिया गांधी यांना त्यांच्या मुलाला पंतप्रधान बनवायचे आहे. पोटात आहे ते उद्धव ठाकरे यांच्या ओठांवर आले आहे. आपली मुले संकटात आली की महाविकास आघाडीच्या नेत्यांना संविधान धोक्यात असल्याचा साक्षात्कार होतो. डॉ. आंबेडकर यांचा सर्वाधिक अपमान काँग्रेसने केला आहे. त्याच काँग्रेसला मते द्या, असे उद्धव ठाकरे सांगत आहेत. अशा या विझलेल्या मशालीला आंबेडकरी जनतेने धडा शिकवावा.

दरम्यान, कर्जत - खालापूर विधानसभा मतदारसंघातून खासदार बारणे यांना एक लाखांहून अधिक मताधिक्य मिळवून देऊ, अशी ग्वाही संतोष भोईर यांनी दिली. नेरळ व कडाव येथील कार्यकर्त्यांनी या सभेत मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केला.

### *केंद्र शासनाच्या माध्यमातून अनेक विकासकामे -आमदार महेंद्र थोरवे*

***आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, खासदार बारणे यांच्या सहकार्यामुळे गेल्या साडेचार वर्षात आपल्या मतदारसंघाला केंद्र व राज्य शासनाकडून तब्बल ९०० ते १००० कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. श्रीरंग बारणे यांनी' या मतदार संघात केंद्र शासनाच्या माध्यमातून अनेक विकासकामे केली. स्वातंत्र्या नंतर पहिल्यांदा तुंगी गावातील ग्रामस्थांनी गावात विजेचा प्रकाश व रस्ता पहिला आहे. माथेरानची बंद होत असलेली मिनिट्रेन रुळावर आणली. पनवेल-कर्जतसाठीची दुसरी रेल्वे लाईन. ही त्यातील महत्वाची कामे आहेत.***

# राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची मतमोजणी केंद्राला भेट

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील रायगड लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान झाल्यानंतर सर्व ईव्हीएम मशीन ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमची व अलिबाग येथील नेहूली येथे उभारण्यात आलेल्या मतमोजणी केंद्राची पाहणी मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केली.

जिल्हा निवडणुक विभागाने केलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी श्री चोक्कलिंगम ३२ रायगड लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर असून काल त्यांनी निवडणुक यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्याची बैठक घेतली. मतदान प्रक्रिया, कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ आदीबाबत माहिती



घेऊन निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत त्याचा आढावा घेतला आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून रोजी होणार असून अलिबाग येथील नेवली येथे उभारण्यात आलेल्या मतमोजणी केंद्राची पाहणी केली. या वेळी त्यांच्या समवेत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड आदी उपस्थित होते.

# उल्हास नदीवरील चांदई पुलाला बसविले सुरक्षा कठडे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर चांदई येथे नव्याने पुल उभारण्यात आला होता. साडे चार कोटी रुपये खर्च करून बनविण्यात आलेल्या पुलाला दोन्ही बाजूंनी सुरक्षा कठडे ठेकेदाराने बनविले नव्हते. त्याबाबत स्थानिक रहिवाशी आणि वाहनचालकांकडून सतत होणाऱ्या मागणीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने अखेर या पुलावर सुरक्षा कठडे (रेलिंग) बसवून घेतले आहेत.

उल्हास नदीवर चांदई गावाजवळ नव्याने पूल बांधण्यात आला आहे. या पुलावरून वाहतूकदेखील सुरु झाली आहे. पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्याची कामे



अर्धवट असतानाही वाहतूक सुरू करण्यात आली आहे. कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साडे चार कोटी खर्चुन उल्हास नदीवर पूल बांधला. चांदई येथे २००० साली पूल बांधण्यात आला होता मात्र तो अरुंद होता. त्यामुळे दुसरा पूल उभारण्याची मागणी सातत्याने होत होती. आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून उल्हास नदीवर चांदई येथे पूल बांधण्याचे काम मंजूर झाले. त्या पुलाचे बांधकाम पूर्ण होऊन मार्च २०२४ मध्ये त्यावरून वाहतूकही सुरू झाली आहे. चांदई येथील पुलाच्या दोन्ही बाजूला कोणत्याही प्रकारचे संरक्षण कठडे बांधण्यात आलेले नव्हते.

त्यामुळे वाहने वेगाने आल्यास ती थेट नदीत कोसळण्याची भीती व्यक्त होत होती. चिंचवली भागाकडून जात असताना वाहनांना धोका निर्माण होईल, अशी परिस्थिती येथे निर्माण झालेली होती.

उल्हास नदीवरील पुलावर संरक्षक कठडे उभारण्यात आले नसल्याबद्दल संतोष कोळंबे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना ही बाब लक्षात आणून दिली होती. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम खात्याने स्थानिकांची मागणी, संभाव्य अपघात आणि धोके लक्षात घेवून लोखंडी रेलिंग बसवून घेण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे वतीने केले आहे. त्याबाबत उप अभियंता संजीव वानखेडे यांनी तत्काळ कार्यवाही केली.

## निवडक

### तंत्रज्ञ हरिश शिंदे सन्मानित



**मोहोपाडा :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित भांडूप नागरी परिमंडळ यांच्या वतीने महावितरणात तंत्रज्ञ म्हणून काम करणाऱ्या कामगारांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी वरिष्ठ तंत्रज्ञ हरिबा विनायक शिंदे यांना मुख्य अभियंता सुनील काकडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. महावितरण कंपनीस सन २०२३-२०२४ या वर्षांत महावितरण कंपनीच्या कामकाजात भरीव योगदान तसेच मोलाचे सहकार्य केल्याबद्दल हरिबा विनायक शिंदे यांना गुणवंत तांत्रिक कामगार सन्मानाने गौरविण्यात आले.

### बेवारस वाहनांबाबत आवाहन

**नवी मुंबई :** एन आर आय सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कारणास्तव प्राप्त झालेली ५५ दुचाकी वाहने, ४- चारचाकी वाहन, १ थ्री व्हीलर एकूण ६० बेवारस वाहने एन आर आय सागरी पोलीस ठाण्याच्या आवारात एकत्र करून ठेवण्यात आली आहेत. वर्षानुवर्षे या वाहनांचे मूळ मालक सदर वाहने घेऊन जाण्यास आलेले नसल्याने एन आर आय सागरी पोलीस ठाण्यामार्फत सदर वाहनांच्या मूळ मालकांनी सात दिवसांच्या आत आपली वाहने कागदपत्रे दाखवून या बातमी सोबत दिलेल्या यादीतील आपल्या वाहनांची ओळख पटवून ती घेऊन जावी, असे आवाहन एन आरआय सागरी पोलीस पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश कदम यानी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# नवी मुंबईतील उद्यानांना बकालपणा


## ऐन सुट्टीत हिरमोड; साहित्य दुरुस्त करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील विविध उद्यानातील खेळणी नादुरुस्त आणि तुटलेल्या अवस्थेत असलेली आढळून येत आहेत. उन्हाळ्याची मुलाना सुट्टी असल्याने नागरिक कुटुंबासहित उद्यानात मोठ्या संख्येने येत असल्याचे दिसून येते. येथील खेळणी दुरुस्त करून बच्चे कंपनी यास मनमुराद खेळू द्यावे, अशी मागणी होत आहे.

नवी मुंबई शहरातील विविध उद्यानातील खेळणी एवढ्या कमी कालावधी तुटतात कशी? असा सवाल नागरिकांकडून विचारण्यात येत आहे. खेळणी पुरवठा करणारे संबंधित ठेकेदाराकडून निकृष्ट दर्जाची खेळणी तर दिली जात नाही ना, असा प्रश्न नागरिकांकडून विचारण्यात येत आहे.

नवी मुंबई मनपा उद्यान विभागाचे विविध ठिकाणी सार्वजनिक उद्यान आहे. या उद्यानात सकाळी व सांयकाळी स्थानिक परिसरातील रहिवाशीं मोठ्या संख्येने येत असतात. या परिसरातील लहान मुले उद्यानातील खेळण्यांवर खेळण्यासाठी येत असतात. सध्या उन्हाळ्याची सुट्टी सुरू असल्याने लहान मुले उद्यानात सतत असतात. या उद्यानातील खेळणी तुटल्याने मुलांना खेळण्याचा आनंद घेता येत नाही व तुटलेल्या खेळण्यांमुळे उद्यानाला बकालपणा आलेला आहे. उन्हाळी सुट्टीत मुलांना उद्यानातील खेळणी दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.





नवी मुंबई शहरामध्ये पालिकेच्या वतीने विविध विभागांमध्ये आकर्षक उद्याने उभारण्यात आली आहेत, मात्र या उद्यानांमध्ये बसविण्यात आलेली विविध खेळाचे साहित्य नादुरुस्त झालेले पाहायला मिळते तसेच अनेक उद्यानांमध्ये साहित्यांची मोड तोड आणि स्वच्छतेबाबतच्या तक्रारी या वारंवार आढळून येत आहेत.

उद्यानातील खेळाचे साहित्य नादुरुस्त झालेली आहेत. पालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या या उद्यानांची देखभाल करण्यासाठी ठेकेदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे, मात्र ठेकेदारांचे दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे.

> नवी मुंबई येथील उद्यानातील मुलांसाठीची खेळाची व करमणुकीची साधने तुटलेल्या अवस्थेत आहेत. सध्या शहरातील शाळांना उन्हाळी सुट्टी लागल्याने शहरातील सर्वच विभागात सकाळी व सायंकाळी बच्चे कंपनीची व पालकांची, ज्येष्ठ नागरिकांची गर्दी पाहायला मिळते, परंतु अनेक उद्यानात कमी जास्त प्रमाणात खेळाच्या साहित्याच्या मोडतोडी झाल्यामुळे लहानमुलांसह नागरिक नागरिकांचा हिरमोड झाला आहे.
>
> **-सुबोध मोहिते**, नागरिक

> जुईनगरमधील कृष्णा शाहीर पाटील उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, तसेच नेरूळ सेक्टर आठ येथील छत्रपती छाहू महाराज उद्यान, नेरूळ सेक्टर २ मधील छत्रपती संभाजी राजे उद्यान, सेक्टर १२ कै पंडित रामा भगत उद्यानासह इतर उद्यानांची खेळणी गायब झाली आहेत. पालिकेने फक्त स्वछतेवर भर न देता उद्यानांकडे लक्ष देणे आवश्यक आहे, लहान मुलांनी खेळाचे कुठे? पालिकेच्या दुर्लक्षामुळे मुलांचा खेळण्यापासून हिरमोड होत आहे.
>
> **-सुनीता औटी**, पालक

> नवी मुंबईमधील विविध उद्यानातील खेळण्याची देखभाल आणि दुरुस्ती नेहमीच केली जाते. जुनी खेळणी नादुरुस्त वा तुटलेल्या अवस्थेत आढळल्यास संबंधित ठेकेदाराला विहित कालावधीत खेळण्याची दुरुस्ती करणे बंधनकारक असते. आमच्याकडे तक्रार आली की आम्ही त्याबाबत त्वरित कारवाई करतो.
>
> **-दिलीप नेरकर**, उपायुक्त (उद्यान विभाग), नवी मुंबई मनपा

# पदपथांच्या कामाची झाडांना झळ; महापालिका आयुक्तांकडे तक्रार



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील पाम बीच रस्त्यावरील डीपीएस एनआरआय परिसरात पडपथाचे काम करण्यात येत आहे, मात्र कंत्राटदाराच्या अज्ञानामुळे यात २० ते ३० वर्ष वाढलेल्या वृक्षांचे नुकसान झाले आहे.

खारफुटी आणि वृक्षतोडीसह फ्लेमिंगोंच्या मृत्यूचे प्रकरण ताजे असतानाच महापालिकेच्या ठेकेदाराने याच भागात पदपथाचे काम करताना झाडांना धोका पोहचल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. विशेष म्हणजे या भागातील सनदी अधिकाऱ्यांच्या वनश्री सोसायटीनजीक हा प्रकार घडला असून, येथील पर्यावरणप्रेमी कांचन पुरोहित यांनी थेट महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली आहे. तसेच याबाबतचे व्हिडीओदेखील व्हायरल झाल्याने थेट पुरावाच पालिकेच्या हाती दिला आहे. त्यामुळे अनेकदा कंत्राटदाराला वाचवण्यासाठी जीवाचा आटापिटा करणाऱ्या पलिकेपुढे आता कारवाई करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

वनश्री सोसायटीच्या परिसरातील सद्यःस्थितीतील पदपथाचे ब्लॉक काढून तिथे नवे ब्लॉक टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, ते करताना संबंधित ठेकेदाराने तिथे असलेल्या २० ते ३० वर्षे जुन्या वृक्षांची कोणतीही काळजी न घेता दगडमाती झाडांभोवती टाकून त्यांना धोका पोहवण्याचे काम केले आहे. खोलवर रुजलेली मुळे काढून त्यावर घाव घालण्यात आला आहे.



## मुर्बी खाडीत माशांचा मृत्यू

**खारघर :** सेक्टर १८,१९ परिसरात मागील बाजूस खारघर खाडीचा भाग आहे. या परिसरात स्थानिक प्रकल्पग्रस्त खाडीच्या पाण्यावर मत्स्यशेती करत असतात. येथे माशांना मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. मुर्बी गावातील सर्वेश ठाकूर, परेश ठाकूर पारंपरीक पद्धतीने याठिकाणच्या शेततळ्यात मत्सशेती करतात. या ठिकाणी विनाप्रक्रिया केलेले सांडपाणी थेट मुर्बी खाडीत सोडले जात असल्याचा आरोप या वेळी ठाकूर कुटुंबीयांनी केला.







**पनवेल :** भाजपचे चिंध्रण पं.स. विभागीय अध्यक्ष तथा भारतीय जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष पांडूरंग पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रल्हाद केणी, कामगार संघटनेचे अध्यक्ष रवी नाईक, शिरवलीचे माजी सरपंच तुकाराम पाटील, रमेश ठाकरे, रवींद्र कोरडे, नामदेव ठाकूर, भिवा पाटील, बूथ अध्यक्ष संजय भगत, माजी सरपंच संतोष पाटील आदी उपस्थित होते.




## कार्ला गडावर स्वच्छता मोहीम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व आई एकवीरा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने शुक्रवारी (दि. ३) आई एकवीरा गड कार्ला लोणावळा येते स्वच्छ्ता अभियान राबविण्यात आले.

यावेळी कार्ला गडाच्या पायथ्यापासून गडावरील परिसर स्वच्छ करण्यात आला. गडावर प्लास्टिक बॉटल, कचरा, कागदाचे गोळे व इतर टाकाऊ वस्तू गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. तसेच कार्ला परिसरात प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून कापडी बॅग वाटप करण्यात आल्या. या वेळी पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, सामाजिक कार्यकर्ते संजय ओगले, रवि भोपी, रोहित इंगळे, निलेश जाधव, अक्षय सकपाळ आदी उपस्थित होते.











**पनवेल :** मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी माजी नगरसेविका नीता माळी, पिंट्या म्हात्रे यांनी आपापल्या प्रभागात तसेच प्रभाग क्रमांक १७मध्ये नवीन पनवेल पंचशील नगर येथे भाजप शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका सुशिला घरत, जगदीश घरत, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, बूथ अध्यक्ष रतन नेमाडे यासोबतच शिवकर येथे सरपंच आनंद ढवळे व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी प्रचार केला.

## भार्गवी कोळीला अमेरिकेत पदव्युत्तर विज्ञान पदवी प्रदान

**नवी मुंबई : बातमीदार**

अनेक आव्हानांचा सामना करत अमेरिकेतल्या प्रसिद्ध युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ फ्लोरिडा या विद्यापीठातून नवी मुंबईतील 'स्मार्ट व्हिलेज' दिवाळे कोळीवाडचाची सुकन्या भार्गवी सुधीर कोळी हिने इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील 'पदव्युत्तर विज्ञान पदवी' अर्थात 'मास्टर्स ाफ सायन्स' या विषयाची पदवी बहाल केली असून, स्वतःच्या मायभूमीसह संपूर्ण पंचक्रोशीत आपल्या नावाची नवी ओळखत निर्माण केली आहे. यामुळे संपूर्ण परिसरातून तिचे कौतुक होत आहे.



गेल्या दोन वर्षांपासून भार्गवी अमेरिकेतील नामवंत 'युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ फ्लोरिडा' या विद्यापीठात 'मास्टर्स ऑफ सायन्स'चे उच्च शिक्षण पूर्ण करून अखेर शुक्रवार (दि. ३) झालेल्या पदवीदान सोहळ्यात भार्गवी कोळी हिला 'मास्टर्स ाफ सायन्स' ही पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. यामुळे, खऱ्या अर्थी आपल्या यशाचं स्वप्न पूर्णकरून अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये आपलं नाव कोरल आहे. या पदवीदान सन्मान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी विविध देशातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी, भार्गवीचे आई-वडील हेदेखील हा अविष्मरणीय सोहळा अनुभवण्यासाठी हजर होते.

दरम्यान, दर्जेदार शिक्षण, शिक्षणपद्धती, लवचिकता, अभ्यासक्रमातील वैविध्य आणि विद्यार्थ्यांना सर्वोत्तम बनवण्यासाठी केले जाणारे प्रयत्न, अशा अनेक कारणांमुळे अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यासाठी देशा-विदेशातून विद्यार्थी येत असतात. अमेरिकेत अनेक सार्वजनिक आणि खासगी विद्यापीठे आहेत. या विद्यापीठांमधून विविध क्षेत्रांचे शिक्षण देणारे भरपूर अभ्यासक्रम उपलब्ध असल्याचे भार्गवी कोळी यांनी सांगितले.

# मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी प्रयत्न करा

## राज्याचे मुरव्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांचे निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी निवडणूक यंत्रणेतील सर्वांनी सर्वंकष प्रयत्न करावेत. मतदारांना सुलभपणे तसेच शांततापूर्ण वातावरणात मतदान करता यावे यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे. त्या दृष्टीने मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून त्याची माहिती मतदारांना द्यावी, निवडणुका मुक्त, निर्भय, व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूकविषयक आढावा बैठकीत ते बोलत होते.




या वेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बढे, निवासी उजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यासह विविध समित्यांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम म्हणाले, मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी दिव्यांग मतदार, ८५ वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरिक यांना आयोगाने घरून मतदान करण्याची (होम वोटिंग) सुविधा दिली आहे. याची अंमलबजावणी काळजीपूर्वक व्हावी. इपिक कार्ड घरोघरी जाऊन वाटप करावेत. दिव्यांग मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे यासाठी ब्रेल वोटर स्लिप दिव्यांग मतदारांपर्यंत पोहचतील याची दक्षता घेतली जावी.

मतदानाच्या दिवशी मतदारांना सर्व आरोग्यविषयक सुविधा मिळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने यंत्रणा सज्ज ठेवा, सर्व अहवाल विहित नमुन्यात आणि विहित वेळेत पाठवावे. पैसा, मद्य तसेच इतर कोणत्याही स्वरुपातील वाटप तसेच बळाचा वापर होऊ नये यासाठी विशेष लक्ष द्यावे. मतदानावर परिणाम करणाऱ्या गैरसमज पसरविणाऱ्या संदेश व घटनांचे खंडन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी जावळे यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली. यामध्ये मतदान केंद्रावर देण्यात येणाऱ्या सुविधा, मतदान जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम, आचारसंहिता कक्षा तसेच इतर कक्ष करीत असलेले कार्य, दिव्यांग मतदारांसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांनी पोलीस विभागाने केलेल्या तयारीची माहिती दिली. यामध्ये कायदा व सुव्यवस्था, चेक पोस्टवरील बंदोबस्त, मनुष्यबळ उपलब्धता याबाबत माहिती देऊन निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत, असे सांगितले.

या वेळी निवडणूकविषयक विविध समितीनिहाय नोडल अधिकारी यांनी कामकाजाची माहिती सादर केली.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी मतदार जनजागृती व सहभागीता कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत झालेल्या उपक्रमांची माहिती दिली तसेच जिल्हा परिषदेमार्फत मतदान केंद्र अंतर्गत केलेल्या विविध सुविधांची माहिती दिली. या वेळी सर्व समिती प्रमुखांनी आपल्या कामकाजचे सादरीकरण केले.

# खोपोलीत मान्सूनपूर्व नालेसफाईला प्रारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीत मान्सूनपूर्व नाले व गटारांच्या साफसफाई कामाला वेग आला आहे. मुख्य नाले, प्रमुख गटारे ही आधुनिक साधनसामुग्री व मनुष्यबळ वापरून, तर रहिवासी भागातील गटारे मनुष्यबळ वापरून सफाई करण्याचे कामे प्रगतिपथावर सुरू आहे.

मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. पंकज पाटील यांनी नाले व गटार साफसफाईबाबतच्या प्राप्त पात्र निविदांना तातडीने मंजुरी देत मान्सूनपूर्व सफाई नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रभागनिहाय कामे सुरू झाली आहेत. यात सह्याद्री डोंगरमाथ्याचे पाणी निचरा होणाऱ्या प्रमुख्य नाल्यांची जेसीबी, तर अन्य आधुनिक सामुग्री वापरून गाळ, गवत काढून सफाई सुरू झाली आहे. रहिवासी भागातील अंतर्गत गटारांची सफाईही मनुष्यबळ वापरून प्रगतिपथावर सुरू झाली आहे.

> **मान्सूनपूर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या कामात दिरंगाई किंवा अडचणी, त्रुटी असल्यास नागरिकांनी थेट आपल्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**
>
> **–डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**



# वेलशेत, आंबेघर येथे महायुतीची प्रचार रॅली



**नागोठणे : प्रतिनिधी**

रायगड रत्नागिरी लोकसभा मतदारसंघांचे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि.३) पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतील वेलशेत व आंबेघर या गावात प्रचार रॅली काढण्यात आली होती. या वेळी बोलताना पिगोंडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष कोळी यांनी नागोठणे विभागातून खासदार तटकरेसाहेबांना तीन हजारांपेक्षा अधिक मताधिक्य देणार, अशी ग्वाही दिली.

कोळी पुढे म्हणाले की, खासदार सुनील तटकरेसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या मंत्री आदिती तटकरे व तरुणांचे आधारस्तंभ आमदार अनिकेत तटकरे यांनी माझ्या पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतील वेलशेत आंबेघर गावासह नागोठणे विभागात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केलेली आहेत. निधीची कमतरता भासू दिली नाही. या विकासकामांवर मतदार बेहद खुश आहेत. देशातील जनता सुखी राहावी तसेच आपल्या पुढील पिढीचे भवितव्य चांगल्या प्रकारे घडावे यासाठी लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुन्हा पंतप्रधान होणे काळाची गरज ओळखून नागोठणे विभागातील जनता खासदार तटकरेसाहेबांच्या पाठीशी ठाम उभी आहे.

प्रचार रॅलीचा शुभारंभ सरपंच कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत वेलशेत येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांना श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यानंतर कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन खासदार सुनील तटकरे यांचा प्रचार केला. या वेळी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रचार रॅलीत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधाकर पारंगे, भाजप नेते राजेंद्र लवटे, ज्येष्ठ नेते विठोबा माळी, युवा नेते प्रल्हाद पारंगे, गोरखनाथ पारंगे, मनसे युवा नेते साईनाथ धुळे, अंकुश ताडकर, मनोज ताडकर, माजी उपसरपंच नाना बडे, सखाराम पारंगे, पुंडलिक ताडकर, रोशन पारंगे, संतोष ताडकर, अनिल पाटील, मनोहर माळी, मारुती पारंगे, दामा बावकर, गंगाराम पारंगे, महिला नेत्या समृद्धी संतोष कोळी, माजी उपसरपंच रंजना माळी, कुसुम बावकर आदींसह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

# नागोठणे विभागातून खासदार सुनील तटकरेंना मताधिक्य देणार –संतोष कोळी

### विकासकामे पाहून मतदान करा –वेदांती तटकरे

**खासदार सुनील तटकरेसाहेबांनी विकास केला, विविध प्रश्न सोडविले. पूर्वीची आयपीसीएल व आताच्या रिलायन्स कंपनीत प्रकल्पग्रस्तांचा नोकरीचा प्रश्न सोडविला. यापुढेही साहेब योग्य तो न्याय देतीलच असा विश्वास व्यक्त करून या विकासकामांवर मतदान करा, असे आवाहन राष्ट्रवादीच्या युवती नेत्या वेदांती अनिकेत तटकरे यांनी वेलशेत येथे केले. प्रचार रॅली संपल्यानंतर वेलशेत येथे ज्येष्ठ नेते सुधाकर पारंगे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत वेदांती तटकरे बोलत होत्या. या वेळी युवती नेत्या विभा चोरगे, राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, सदानंद गायकर, शिवराम शिंदे, डॉ. राजेंद्र धात्रक, संतोष कोळी, सुधाकर पारंगे, चंद्रकांत गायकवाड, बाळासाहेब टके, मंगेश तेरडे, भाजपचे एकनाथ ठाकूर, राजेंद्र लवटे, मोरेश्वर म्हात्रे, बिठोबा माळी, आरपीआय नेते संतोष गायकवाड तसेच महायुतीचे कार्यकर्ते व महिला वर्ग उपस्थित होते.**

# सुधागडातील कानसळला स्वप्नातील गावाचा दर्जा

**पाली : प्रतिनिधी**

रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशन संस्थेच्या वतीने दक्षिण रायगडातील सात तालुक्यांमध्ये गाव विकासाची कामे लोकसहभागातून केली जात आहेत. याच कामाला गती देण्यासाठी आणि लोकांमध्ये ऊर्जा निर्माण करण्यासाठी स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे आणि संचालक प्रदीप साठे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वप्नातील गाव या उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये सुधागड तालुक्यातील कानसळ हे गाव सलग दुसऱ्या वर्षी स्वप्नातील गाव म्हणूण नुकतेच घोषित करण्यात आले.



कानसळ गाव विकास समिती, युवा मंडळ, महिला आणि ग्रामस्थ यांनी एकत्रित येऊन गाव विकास व आदर्श गाव करण्याच्या हेतूने २०१९पासून प्रयत्न सुरू केले. स्वदेस फाउंडेशनच्या सहकार्याने गावकऱ्यांनी स्वच्छ, सुंदर, स्वास्थ, साक्षर आणि समृद्ध या मुख्य घटकांचा विचार करून गाव विकास आराखडा बनवला आणि त्यानुसार कामाला सुरुवात केली. गाव सुंदर आणि आकर्षक दिसण्यासाठी गावातील महिला व युवक यांनी हिरीरीने सहभाग घेतला. त्यामुळे दुसऱ्यांदा हे गाव स्वप्नातील गाव म्हणून घोषित करण्यात आले.

या कार्यक्रमास स्वदेस फाऊंडेशनचे संचालक प्रदीप साठे, वरिष्ठ व्यवस्थापक शिवदास वायाळ, वरिष्ठ समन्वयक सोनाली पवार, किरण शिंदे उपस्थित होते. त्याचप्रमाणे गाव विकास समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जतमध्ये मोफत नेत्रचिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**कर्जत** : येथे घुमरे मित्र मंडळाच्या वतीने आर झुनझुनवला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलच्या सहकार्याने मोफत नेत्रचिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

माजी नगरसेवक बळवंत घुमरे व बिमिता घुमरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी जयवंत बोराडे, अभिषेक तिवारी, बिराज पाटकर, कुमार गायकवाड, करण घुमरे, दुर्गेश जोशी, तानाजी वाघमारे, अरुण निघोजकर, श्रीनिवास राव, दिनेश गाणीगा, मारुती बैलमारे, वसंत मोधळे आदी उपस्थित होते.



आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या डॉ. पाटील यांनी रुग्णांची तपासणी केली. १०० लोकांनी त्याचा लाभ घेतला. यात १३ लोकांना मोतिबिंदू आढळला. त्यांना शंकरा आय हॉस्पिटल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले.

# माणगावात एक हात मदतीचा उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील स्व. शाहीर पांडुरंग अधिकारी सेवाभावी संस्था पेण तर्फे तळे संस्थेचा दहावा वर्धापन दिन शुक्रवारी (दि. ३) उत्साहात झाला. संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्ताने या वर्षी एक हात मदतीचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत समाजातील रुग्ण व गरजू व्यक्तींना आर्थिक स्वरूपाची रोख रक्कम देण्यात आली. शाहीर भागोजीबुवा पोटले यांनी गुरूवंदना सादर करून कार्यक्रमास सुरुवात केली. गुरुवर्य शाहीर शिवरामबुवा पोटले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष विद्यानंद अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते नितीन खडतर, दगडू पाखड, सदानंद अधिकारी, स्नेहा अधिकारी, बाळाजी कालप, सखाराम जाबडे, चंद्रकांत मोंडे, बेंडू मोंडे, शाहीर पोपट पोटले, आत्माराम पोटले, गणेश मोंडे, बालाजी पोटले, दगडू आरसे, काशिराम कालप आदी उपस्थित होते.

नितीन खडतर, विद्यानंद अधिकारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित शेडगे यांनी केले.



# माणगाव येथे बुधवारी नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव** : माणगाव येथे शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.८) रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत नितीन मेथा यांचे सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव या ठिकाणी करण्यात आले आहे.

या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्डची झेरॉक्स प्रत आणावी तसेच मधुमेह व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# सदानंद तांडेल सेवानिवृत्त

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील द. ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक सदानंद तांडेल आपली ३६ वर्षे सेवा करून निवृत्त झाले. त्यांनी कार्यकाळात विषय शिक्षकाबरोबरच क्रीडा शिक्षकाची भूमिका योग्य प्रकारे बजावली.

गेल्या सतरा वर्षांत व्हॉलीबॉल स्पर्धेत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यार्थ्यांना खेळवून यश संपादन केले. रोहा तालुकास्तरावर तर त्यांनी आजपर्यंत एकही फायनल इतर विद्यालयाला मिळवू दिली नाही. त्यांचा १ मे रोजी सेवापूर्ती सोहळा झाला. त्यांच्याबरोबर मारुती देशमुख, गोकुळ तिरमाळे हे शिक्षकही सेवानिवृत्त झाले.

या कार्यक्रमास सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संचालक व कळंबोली हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेंद्र पालवे, प्रशासकीय अधिकारी मिलिंद जोशी, मुख्याध्यापक सुखदेव तिरमळे, शिक्षक पाटील, यशवंत खराडे, एम.डी. देशमुख, जी.व्ही. तिरमाले, श्री. थोरात, संतोष चांदोरकर, स्नेहा तांडेल, प्रसाद तांडेल, सुरज तांडेल, प्रिया तांडेल व इतर शिक्षक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन खरोसे यांनी केले.



# मुंबईच्या पराभवाचा ‘चौकार’

## १२ वर्षानंतर कोलकाताचा वानखेडेच्या मैदानात विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये शुक्रवारी झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने मुंबई इंडियन्सवर २४ धावांनी विजय मिळवत इतिहास रचला. कोलकाताने २०१३नंतर प्रथमच वानखेडे स्टेडियमवर मुंबईला पराभूत केले आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कोलकाताने व्यंकटेश अय्यरच्या अर्धशतकाच्या जोरावर सर्वबाद १६९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईचा संघ १८.५ षटकांत १४५ धावांवर गारद झाला. कोलकातासाठी मिचेल स्टार्कने चार विकेट्स घेत विजयात महत्त्वाची भूमिका निभावली.



लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या मुंबई इंडियन्सची सुरुवात खूपच खराब झाली. संघाने ४६ धावांत तीन विकेट्स गमावल्या होत्या. रोहित शर्मा ११ धावा, इशान किशन १३ आणि नमन धीर ११ धावाच करू शकला. सूर्यकुमार यादव खंबीरपणे उभा राहिला, पण दुसऱ्या टोकाकडून सातत्याने विकेट पडत होत्या. सूर्यकुमारने ३५ चेंडूंत ५६ धावा केल्या. यात त्याने सहा चौकार आणि दोन षटकारही लगावले, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. मुंबईच्या इतर कोणत्याच गोलंदाजाला खेळपट्टीवर तग धरता आला नाही. त्याचबरोबर आता मुंबईच्या प्ले ऑफमध्ये पोहोचण्याचा आशा संपुष्टात आल्या.

वास्तविक, सामन्याचा गेम चेंजर आंद्रे रसेल ठरला, ज्याने सूर्यकुमार यादवची विकेट घेत सामना कोलकाताकडे वळवला. याशिवाय त्याने हार्दिक पांड्याची विकेटही घेतली. त्याचबरोबर सुनील नरेन (२), वरुण चक्रवर्ती (२) आणि मिचेल स्टार्कने (४) शानदार गोलंदाजी केली.

तत्पूर्वी नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेला कोलकाता नाईट रायडर्स संघ मुंबई इंडियन्सविरुद्ध संघर्ष करताना दिसला. ५७ धावांवर संघाने पाच विकेट गमावल्या. मुंबईच्या गोलंदाजीसमोर सॉल्ट-नरीनसारखे फलंदाज पूर्णपणे फ्लॉप ठरले. या सामन्यात सॉल्टने पाच धावा, रघुवंशीने १३ धावा, श्रेयस अय्यरने सहा धावा, सुनील नरेनने आठ धावा आणि रिंकू सिंगने नऊ धावा केल्या. यानंतर मयंक पांडे आणि व्यंकटेश अय्यर यांनी मोर्चा सांभाळला. दोघांमध्ये सहाव्या विकेटसाठी ६२ चेंडूंत ८३ धावांची भागीदारी झाली. प्रभावशाली खेळाडू म्हणून आलेल्या पांडेला हार्दिकने बाद केले. तो ४२ धावा करून परतला. कोलकाताला १७व्या षटकात दोन धक्के बसले. या षटकात आंद्रे रसेलला केवळ सात धावा करता आल्या. अय्यरने नाबाद ७० धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान त्याच्या बॅटमधून सहा चौकार आणि तीन षटकार आले.

या सामन्यात मुंबईच्या गोलंदाजांनी धुमाकूळ घातला. जसप्रीत बुमराहने तीन विकेट घेतल्या. वानखेडे स्टेडियमवर त्याने ५० विकेट पूर्ण केल्या. याशिवाय नुवान तुषाराने तीन, कर्णधार पांड्याने दोन आणि पियुष चावलाने एक विकेट घेतली.

## वर्ल्डकपसाठी यजमान विंडीजने उतरवला तगडा संघ

**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

यजमान वेस्ट इंडिजने ट्वेंटी-२० विश्वचषकासाठी आपल्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. येत्या जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेमध्ये ट्वेंटी-२० विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यातून कसोटीमध्ये पदार्पण करून सामना गाजवणाऱ्या शामर जोसेफला विश्वचषकाच्या संघात स्थान मिळाले आहे, तर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ट्वेंटी-२० मालिकेला मुकलेल्या शिमरॉन हेटमायरलादेखील संधी मिळाली आहे.

आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्यांशिवाय काही नव्या चेहऱ्यांना विंडीजच्या संघात स्थान मिळाले आहे. अकिल हुसैन आणि गुडाकेश मोती यांच्यावर फिरकी गोलंदाजीची जबाबदारी असणार आहे. विश्वचषक खेळणाऱ्या २० संघांचे चार गटांत विभाजन करण्यात आले आहे. २०१२ आणि २०१६चा चॅम्पियन कॅरेबियन संघ क गटात असून यामध्ये अफगाणिस्तान, न्यूझीलंड, युगांडा आणि पापुआ न्यू गिनी या संघांचा समावेश आहे.

**संघ** : रोवमन पॉवेल (कर्णधार), अल्झारी जोसेफ, जॉन्सन चार्लेस, रोस्टन चेस, शिमरॉन हेटमायर, जेसन होल्डर, शाई होप, अकिल हुसैन, शामर जोसेफ, ब्रँडन किंग, गुडाकेश मोती, निकोलस पूरन, आंद्रे रसेल, शेरफेन रुदरफोर्ड आणि रोमॅरियो शेफर्ड.

## हैदराबादची नवी मिस्ट्री गर्ल चर्चेत

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबाद म्हटले की काव्या मारन हिची चर्चा होते. या संघाची सहमालकिण असलेली काव्या ही सन नेटवर्कचे मालक कलानिथी मारन यांची मुलगी आहे





पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली सनरायझर्सने गुरुवारी राजस्थान रॉयल्सवर थरारक विजयाची नोंद केली. भुवनेश्वर कुमारने २०व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर राजस्थानच्या फलंदाजाला बाद करून एक धावेने हैदराबादला विजय मिळवून दिला. भुवीचा तो शेवटचा चेंडू पडेपर्यंत काव्या अगदी शांत व तणावग्रस्त दिसली, परंतु भुवीने विकेट घेताच तिने जोरदार जल्लोष केला. या वेळी तिच्याएवजी मिस्ट्री गर्लचीच चर्चा रंगताना दिसतेय.

ही मिस्ट्री गर्ल सनरायझर्स हैदराबादला चिअर करण्यासाठी स्टेडियमवर पोहचली आणि साऱ्यांच्या नजरा तिच्यावर खिळल्या. राम्या कुरलेती असे तिचे नाव आहे. राम्या ही एक तेलुगु चित्रपट अभिनेत्री आहे. तिने २०१८मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘हुशारू ‘ या चित्रपटाद्वारे तिच्या फिल्मी करिअरची सुरुवात केली. ‘माइल्स ऑफ लव्ह‘, ‘फर्स्ट रँक राजू‘ आणि ‘बेस्ट फ्लॅटमेट फॉरएव्हर’ या वेब सीरिजमध्ये अभिनय केल्यानंतर ती प्रसिद्ध झाली.

## पियुष चावलाने टाकले ब्राव्होला मागे

**मुंबई** : आयपीएलमध्ये शुक्रवारी (दि.३) झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघ कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात हरला, परंतु मुंबईचा फिरकीपटू पियुष चावलाने या सामन्यात एक विकेट घेतली आणि त्याने ड्वेन ब्राव्होला मागे टाकले. यासह चावला आयपीएलमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा दुसरा गोलंदाज ठरला आहे.



**आयपीएलमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा ठरला दुसरा गोलंदाज**

कोलकाताच्या डावातील सातव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर पियुष चावलाने रिंकू सिंगला झेलबाद केले. रिंकूच्या विकेटसह चावलाने आयपीएलमध्ये १८४ विकेट्स पूर्ण केल्या. ड्वेन ब्राव्होने आयपीएलमध्ये १८३ विकेट्स घेतल्या आहेत. आता चावला आयपीएलमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा दुसरा गोलंदाज ठरला आहे. या यादीत अव्वलस्थानी युजवेंद्र चहल आहे, ज्याने आयपीएलमध्ये २०० विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.

## अमेरिकेच्या वर्ल्डकप संघात निम्मे खेळाडू भारतीय

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषक येत्या १ जूनपासून वेस्ट इंडिज आणि अमेरिका यांच्या यजमानपदाखाली खेळवली जाणार आहे. यंदा २० संघ विश्वचषकात सहभागी होणार आहेत, ज्यामध्ये अमेरिकेचादेखील समावेश आहे. ते प्रथमच या स्पर्धेचा भाग असतील. अमेरिकेने आपला टी-२० वर्ल्डकपसाठीचा संघ जाहीर केला आहे. या संघात निम्मे खेळाडू हे भारतीय वंशाचे आहेत, तर न्यूझीलंड संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेला एक खेळाडूही वर्ल्डकपमध्ये अमेरिकेकडून खेळताना दिसेल.



टी-२० विश्वचषक संघात अमेरिकेच्या संघात अष्टपैलू कोरी अँडरसनचा समावेश करण्यात आला आहे. अँडरसनने न्यूझीलंडकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहेत. त्याने न्यूझीलंडसाठी एकदिवसीय आणि टी-२० विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धाही खेळल्या आहेत. २०१५मध्ये अंतिम सामना खेळलेल्या न्यूझीलंड संघाचा तो भाग होता, पण काही काळापूर्वी त्याने न्यूझीलंड संघ सोडून अमेरिकेच्या संघात जाण्याचा निर्णय घेतला होता आणि आता तो टी-२० विश्वचषकात अमेरिकेकडून खेळताना दिसणार आहे.

यासोबतच अमेरिकेच्या संघात अनेक भारतीय वंशाच्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. मोनांक पटेल हा अमेरिकेच्या संघाचा कर्णधार आहे. पटेल हा भारतीय असून त्याचा जन्म गुजरातमधील आहे, तर फलंदाज मिलिंद कुमार याने २०१८-१९च्या रणजी ट्रॉफीमध्ये सिक्कीम संघाचे प्रतिनिधित्व केले होते. अमेरिकेसाठी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी आयपीएलमधील दिल्ली डेअरडेव्हिल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा भागही होता.

मुंबईचा माजी डावखुरा फिरकीपटू हरमीत सिंगलाही संघात स्थान मिळाले आहे. मुंबईत जन्मलेल्या ३१ वर्षीय खेळाडूने २०१२च्या अंडर-१९ विश्वचषकात भारताचे प्रतिनिधित्व केले होते. भारताकडून अंडर-१९ विश्वचषक संघात खेळलेला सौरभ नेत्रावळकरही अमेरिकेच्या संघात आहे.

संघ : मोनांक पटेल (कर्णधार आणि यष्टिरक्षक), ॲरोन जोन्स (उपकर्णधार), अँड्रिज गॉस, कोरी अँडरसन, अली खान, हरमीत सिंग, जेसी सिंग, मिलिंद कुमार, निसर्ग पटेल, नितीश कुमार, नोशतुश केंजिगे, सौरभ नेत्रावलकर, शेडली व्हॅन शाल्कविक, स्टीव्हन टेलर आणि शायन जहांगीर.

## मुंबईच्या पराभवानंतर इरफान पठाणचे कर्णधार हार्दिक पांड्याच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सच्या मागे चिकटलेले पराभवाचे शुक्लकाष्ठ संपायला तयार नाही. घरच्या मैदानावर म्हणजे वानखेडेवर शुक्रवारी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात मुंबई संघाला या हंगामातील आठवा आणि सलग चौथा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे प्ले ऑफमध्ये जाण्यासाठी आता अडचणी निर्माण झाल्या आहेत. या सामन्यात मुंबई इंडियन्सला जिंकण्याची पूर्ण संधी होती, मात्र सामन्यात घेतलेले काही आश्चर्यकारक निर्णय आणि ढिसाळ फलंदाजीमुळे मुंबई इंडियन्सचा पराभव झाला, असे मत भारताचा माजी जलदगती गोलंदाज इरफान पठाणने म्हटले आहे तसेच कर्णधार हार्दिक पांड्याची चूक लक्षात आणून देताना काही मोठी विधाने केली आहेत.

प्रथम फलंदाजी करताना कोलकाता संघाने १७० धावांचे आव्हान दिले होते, मात्र लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईचा संघ १४५ धावांवरच गडगडला. कोलकाताकडून गोलंदाजीत मिचेल स्टार्कने चार, तर आंद्रे रसेल, वरुण चक्रवर्ती आणि सुनील नरेन यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. संघाने या विजयासह १२ वर्षांनंतर मुंबई इंडियन्सला त्यांच्या घरच्या मैदानावर पराभूत करण्यात यश मिळवले आहे.



मुंबई इंडियन्सकडून सुर्यकुमार यादव (५६ धावा) वगळता एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. रोहित शर्मा, कर्णधार हार्दिक पांड्या आणि इतर फलंदाज फारशी चमक दाखवू शकले नाहीत. या पराभवाच्या पार्श्वभूमीवर इरफान पठाणने सांगितले की, पांड्याने गोलंदाजी करताना घेतलेले काही निर्णय यासाठी कारणीभूत आहेत तसेच संघाकडून पांड्याला आदर मिळत नसल्याचाही दावा पठाणने केला.

पहिल्यांदा फलंदाजी करीत असताना कोलकाताच्या ५७ धावांवरच पाच विकेट पडल्या होत्या. सामन्यात इतकी चांगली आघाडी घेतल्यानंतर पांड्याने नमन धीरच्या हाती चेंडू दिला. नमन धीरने लागोपाठ दोन ओव्हर टाकल्या, ज्यात त्याने अनुक्रमे ८ आणि ११ धावा दिल्या, मात्र पांड्याच्या या निर्णयामुळे वेंकटेश अय्यर आणि मनिष पांडे यांना भागीदारी रचण्याची मोकळीक मिळाली, असे इरफान पठाणने म्हटले आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करण्यात येते, जे योग्य वाटते. जेव्हा तुम्ही ५७ धावांवर पाच विकेट घेता तेव्हा नमन धीरकडून लागोपाठ तीन ओव्हरच्या करण्यामागचा विचारच कळत नाही. तुम्ही जर मुख्य गोलंदाजांना चेंडू दिला असता, तर कदाचित परिणाम वेगळे दिसले असते. तुम्ही वेंकटेश अय्यर आणि मनिष पांडेला ८३ धावांची भागीदारी रचण्याची संधी दिली,’ असे पठाण म्हणाला. सर्वांना एकत्र आणावे लागेल आणि सर्व खेळाडूंनी कर्णधाराला स्वीकारावे लागेल आणि त्याला आदर द्यावा लागेल, असेही पठाणने नमूद केले.



पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ भाजप शहराध्यक्ष अनिल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील गुरू शरणम कॉम्प्लेक्समध्ये प्रचार फेरी काढण्यात आली होती.



खारघर : लोकसभा निवडणुकीसाठी मावळ मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचा माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, सरचिटणीस दीपक शिंदे, युवा नेते प्रवीण बेरा, संध्या शारबिद्रे, संजय घरत यांनी अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत प्रचार केला.



कळंबोली : महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी जि.प. सभापती प्रिया मुकादम यांनी सहकाऱ्यांसमवेत मतदारांना पत्रकाचे वाटप केले.




खांदा कॉलनी : पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजपचे रामनाथ पाटील, गोपीनाथ मुंडे, सचिन गायकवाड, सिद्धेश खानावकर, तन्मय सावंत आदींनी मावळ मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारात सहभाग घेतला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com